# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २१/०९/२०१०

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २१/०९/२०१० रोजी सभा सुचना क्र. ०९ दि. ०९/०९/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. दिनेश नलावडे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सभापती |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| ३) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| ५) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ६) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ७) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ८) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| १०) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| ११) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| १२) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |
| १३) | श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |
| १४) | सौ. निर्मला सावळे | -- | सदस्या |
| १५) | सौ. अनिता पाटील | -- | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

मा. स्थायी समितीची सर्व सदस्य, मा. आयुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व अधिकारी पदाधिकारी आपणा सर्वांचे ह्या ठिकाणी स्वागत करतो. तसेच सचिव साहेब आपण सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. १८/०९/२०१० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. या सभेची वेळ बदलण्यात आलेली असून मंगळवार दि. २१/०९/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात आयोजित केलेली आहे.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब बीपीएमसी ॲक्ट १९४९ २(क) खाली एक विषय घ्यायचा आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय घेण्यास सदस्याची मान्यता आहे ना.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब माझ एक प्रकरण २ (क) मध्ये आयत्या वेळेचा विषय आहे. तर सभागृहाने त्याला मान्यता द्यावी.

**मा. सभापती :-**

दोन्ही विषय आपल्या विषयपत्रिकेवरील विषय संपल्यानंतर घेण्यात येतील.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्रं. ६६, महिला व बालकल्याण समिती अंतर्गत इतर लेखाशिर्ष मधून खर्च न पडणारी रक्कम प्रशिक्षण या लेखाशिर्षा करीता वर्ग करणेबाबत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

माझासुध्दा विषय आहे तो नंतर मान्यतेसाठी घेण्यात यावा.

**जुबेर इनामदार :-**

सभापती साहेब आपली इतिवृत्तांत यायचे बाकी आहे.

**निर्मला सावंत :-**

महानगरपालिका क्षेत्रामध्ये महिला व बालकल्याण समिती अंतर्गत प्रशिक्षण लेखाशिर्षा अंतर्गत झालेला खर्च व मार्च २०११ पर्यंत अंदाजित होणारा खर्च लक्षात घेता सदरची रक्कम अपुरी पडणार आहे. सदर लेखाशिर्षाकरीता २५ लाख ५० हजार वाढीची रक्कम इतर लेखाशिर्षामधुन खर्च न पडणारी रक्कम महिला व बालकल्याण समिती अंतर्गत प्रशिक्षण/शिबीरे/मेळावे या लेखाशिर्षाकरीता सोबत जोडलेल्या विवरण पत्रानुसार वर्ग करणेस व येणा-या खर्चास आर्थिक प्रशासकीय मंजुरी देत आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नमुना क्र. १०
## नियम ३० (३) पहा
## पुर्नविनियोजनाचे विवरणपत्र

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | अद्यावत खर्च | उपलब्ध शिल्लक | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | अद्यावत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | महिला व बालकल्याण अंदाजपत्रक, सकस आहार पुरवठा | २५.०० | ३.०० | २२.०० | महिला व बालकल्याणसाठी कार्यक्रम/प्रशिक्षण /शिबीरे/मेळावे | १०.०० | ९.१८ | १२.०० | महिला व बालकल्याण कार्यक्रमा अंतर्गत कार्यक्रम/प्रशिक्षण/शिबीरे/मेळावे याकरिता रु. १०.०० लाख इतकी तरतुद असून सदर लेखाशिर्षाअंतर्गत झालेला खर्च व मार्च २०११ पर्यंत अंदाजित होणारा खर्च लक्षात घेता सदरची रक्कम अपुरी पडणार आहे. सदर लेखाशिर्षाकरीता २५ लाख ५० हजार वाढीची रक्कम इतर लेखाशिर्षामधून खर्च न पडणारी रक्कम महिला व बालकल्याण कार्यक्रमा अंतर्गत कार्यक्रम/प्रशिक्षण/शिबीरे/मेळावे या लेखाशिर्षा करीता वर्ग करणेस ही सभा मंजुरी देत आहे. |
| २ | आरोग्य विषयक प्रचार व प्रसार | ५.०० | -- | ५.०० | | | | ४.०० | |
| ३ | शिलाई मशिन वाटप | १०.०० | -- | १०.०० | | | | ९.५० | |

**अनिल सावंत :-**

सभापती साहेब हा जो महिला बालकल्याणचा विषय सकस आहारा पुरवठा करिता २५ लाखाची तरतूद आहे. आणि आज जवळ जवळ सहा महिने संपले तीन लाखच खर्च झाले. सकस आहार पुरवठा योजना बंद आहे की प्रोव्हिजन जास्त आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सभापती प्रोव्हीजन जास्त आहे. आपल्याकडे २७ बालवाड्या आहेत.

**अनिल सावंत :-**

२७ बालवाड्या आहेत. विद्यार्थी किती आहेत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

१ हजार ७१ विद्यार्थी आहेत. त्यामुळे प्रत्येक दिवशी शेंगदाणे, बिस्किट, कधी अंडी असा सकस आहार देतो. ५०-५०, १०० ग्रॅम देतो.

**अनिल सावंत :-**

सकस आहारा विषयी बोलतोय. सकस आहारासाठी महासभेने जी तरतूद केली. लहान मुलासाठी २५ लाखांची तरतूद केली. सकस आहारामध्ये काय काय असते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आहारामध्ये वेगवेगळे प्रकार असतात. कधी अंडी, बिस्किट, केळी, शेंगदाणे असतात.

**अनिल सावंत :-**

एका विद्यार्थ्याला एका दिवसाला किती खर्च येतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

दिवसाला १० रूपये.

**अनिल सावंत :-**

दिवसात १० हजार रुपये आले. महिन्याला किती झाले? अडीच लाख खर्च झाले. वर्षाला २.५ लाख झाले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

शनिवार, रविवार सुट्टी असते. दोन, तीन महिने बालवाडी बंद असते.

**अनिल सावंत :-**

फक्त १० टक्के खर्च होणार आहे. त्याच्याबरोबर मुलांच्या सकस आहारामध्ये दूध वाढवा एक ग्लास दूध द्या. मुलांना चणे-शेंगदाणे देऊन तो सकस आहार होतो का? पालिका ज्यावेळेला महासभा जेथे खर्च करायला तयार आहे. तेथे तुम्ही कंजूशी का करता. पोराच्या पोटावर का मारता. शासनाची योजना आहे. महापालिकेने प्रोव्हीजन केली आहे. त्यांना सकस आहार द्या चणे-शेंगदाणे कशाला देता.

**मा. आयुक्त :-**

सकस आहाराचे नियम सरकारने घालून दिलेले आहेत दूध जर दिल आणि काय झाल.

**अनिल सावंत :-**

मनूका द्यायचेच नाहीत का अस कस म्हणता मुंबई महापालिकामध्ये चालू आहे. उल्हासनगरला चालू आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही ठराव करा. दुध द्या म्हणून. मा. सभापती साहेब एकूण आमच्याकडे १०७१ बालवाडीची मुले आहेत. त्यामध्ये एप्रिल, मे जूनमध्ये शाळा चालू होते. आणि उपस्थितीवर आम्ही आहार देतो. उपस्थिती संख्या आणि आहार कॅल्क्युलेशन करून आम्ही बिल अदा करतो.

**अनिल सावंत :-**

उपस्थिती किती परसेंट असते एव्हरेज काढले असेल ना तुम्ही. एवढी कमी उपस्थिती असण्याच कारण काय? चांगला आहार द्याल तर उपस्थिती वाढेल शासनाचा तोच दृष्टीकोन आहे.

**मा. आयुक्त :-**

ही गोष्ट सदस्यानी आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्या आईवडिलांना समजावून सांगायला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब सकस आहार जर दिला तर उपस्थिती वाढेल.

**मा. आयुक्त :-**

सकस आहार देतो म्हणून एवढी उपस्थिती आहे. दिल नसत तर गैरहजरच राहिले असते. तूमच मतदान सुध्दा ५०-६० टक्के होत. आम्ही जर तुम्हाला विचारल तर मतदान का कमी झाले.

**अनिल सावंत :-**

५० टक्के नावच यादीमध्ये नसतात.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला मी प्रश्न विचारला मतदानाची टक्केवारी का वाढली नाही. कोण बाहेर गेलेले असतात कोण आजारी असतात कोणला इन्ट्रेस्ट नसतो.

**अनिल सावंत :-**

नाही ती यादी ५० टक्के लोकांची असते.

**मा. आयुक्त :-**

डोळ्यात तेल घालून ती यादी तपासतात. माझ्या वॉर्डात कोण नविन आलेल आहे.

**मा. सभापती :-**

वोटिंग कमी होण्याच एक कारण लोकांचा महानगरपालिकेवर राग. काम होत नाही, नगरसेवकांवरची नाराजी.

**मा. आयुक्त :-**

सकस आहाराविषयी माझ्याकडे एकही तक्रार आलेली नाही.

**अनिल सावंत :-**

चणे-शेंगदाण्याविषयी काय तक्रार आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण बजेट प्रोव्हिजन जास्त केली. उद्या जर तुम्ही ५० लाखाची केली. आणि रोज नविन काहीतरी द्या. अस नाही चालणार. ते बजेटवर अवलंबून नसत.

**अनिल सावंत :-**

गरिब मुले दुवा देतील.

**मा. आयुक्त :-**

आठवड्यातून दोन वेळा अंडी देतो.

**अनिल सावंत :-**

सर महिला बालकल्याण आरोग्य विषयक प्रचार आणि प्रसार त्यामध्ये नेमक काय करता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण हेल्थ सेंटरकडून दर तीन महिन्यांकरीता आरोग्याची तपासणी करुन घेतो. ते आपल्या महानगरपालिकेकडूनच होते.

मा. सभापती :-

प्रकरण क्र. ६६ सर्वानुमते मंजुर. सचिव साहेब पुढील विषय घ्या.

**प्रकरण क्र. ६६ :-**

महिला व बालकल्याण समिती अंतर्गत इतर लेखाशिर्ष मधून खर्च न पडणारी रक्कम प्रशिक्षण या लेखाशिर्षा करीता वर्ग करणेबाबत.

**ठराव क्र. ५८ :-**

महानगरपालिका क्षेत्रामध्ये महिला व बालकल्याण समिती अंतर्गत प्रशिक्षण लेखाशिर्षा अंतर्गत झालेला खर्च व मार्च २०११ पर्यंत अंदाजित होणारा खर्च लक्षात घेता सदरची रक्कम अपुरी पडणार आहे. सदर लेखाशिर्षाकरीता २५ लाख ५० हजार वाढीची रक्कम इतर लेखाशिर्षामधुन खर्च न पडणारी रक्कम महिला व बालकल्याण समिती अंतर्गत प्रशिक्षण/शिबीरे/मेळावे या लेखाशिर्षाकरीता सोबत जोडलेल्या विवरण पत्रानुसार वर्ग करणेस व येणाऱ्या खर्चास आर्थिक प्रशासकीय मंजुरी देत आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नमुना क्र. १०
## नियम ३० (३) पहा
## पुर्नविनियोजनाचे विवरणपत्र

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | अद्यावत खर्च | उपलब्ध शिल्लक | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | अद्यावत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | महिला व बालकल्याण अंदाजपत्रक, सकस आहार पुरवठा | २५.०० | ३.०० | २२.०० | महिला व बालकल्याणसाठी कार्यक्रम/प्रशिक्षण /शिबीरे/मेळावे | १०.०० | | १२.०० | महिला व बालकल्याण कार्यक्रमा अंतर्गत कार्यक्रम/प्रशिक्षण/शिबीरे/मेळावे याकरिता रु. १०.०० लाख इतकी तरतुद असून सदर लेखाशिर्षाअंतर्गत झालेला खर्च व मार्च २०११ पर्यंत अंदाजित होणारा खर्च लक्षात घेता सदरची रक्कम अपुरी पडणार आहे. सदर लेखाशिर्षाकरीता २५ लाख ५० हजार वाढीची रक्कम इतर लेखाशिर्षामधून खर्च न पडणारी रक्कम महिला व बालकल्याण कार्यक्रमा अंतर्गत कार्यक्रम/प्रशिक्षण/शिबीरे/मेळावे या लेखाशिर्षा करीता वर्ग करणेस ही सभा मंजुरी देत आहे. |

**सुचक :- सौ. निर्मला सावळे** **अनुमोदक :- सौ. अनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६७, वार्षिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

जुने सेसचे पैसे वसुल करायचे. उर्वरित रक्कम फक्त ७५ लाख रू. तुम्ही दाखवली. आयुक्त साहेब, काल एक विषय माझ्या समोर आला एल.बी.टी. चा चेक नाक्यावर अशी एक योजना केली होती की एलबीटी मध्ये जे रजिस्टार्ड नाहीत जे ग्राहक ज्याची नोंदणी झाली नाही त्यांना आपण चेकनाक्यावर जागेवर नोंदणी करून देऊ काल असा विषय झाला की, ज्याच्या परिचयाचा व्यक्ती आहे तो तेथे मशिन घेऊन आला त्यांनी नविन व्यवसाय चालू करायला घेतला. त्यांना याची माहिती नव्हती. नाक्यावर आल्यानंतर त्याची गाडी अडवली त्यांनी मशिन आणली होती. त्यांनी मला फोन केला मी त्याला सांगितल तेथेच तू करून घे. एलबीटी रजिस्ट्रेशन तिथेच होतो. त्यांनी आपल्या कर्मचाऱ्याना फोन दिला तो म्हणाला आमच्याकडे ते होत नाही. भायंदर वेस्टमध्ये जायला लागेल मी राऊत साहेबांना फोन केला राऊत साहेब म्हणाले आपल्या नाक्यावरच होणार. नंतर ते म्हणाले खेत्रे साहेबांशी बोलून घ्या मी खेत्रे साहेबांना फोन केला खेत्रे साहेबांनी त्याला बोलावून घेतल. त्याला मदत केली त्याली रजिस्ट्रेशन करून दिल. अशी आपण सोय करून दिली तर आपली रजिस्ट्रेशन वाढतील.

**मा. आयुक्त :-**

कोणी सांगितल इकडे रजिस्ट्रेशन होणार नाही. त्या व्यक्तिच नाव सांगा. रजिस्ट्रेशन करण्यासाठी जे ऑफिस आहे त्या ऑफिसने का केल नाही हे एक सदस्य होते म्हणून राऊतना फोन केला पण जनरल पब्लिक येणार ते सगळ्याशीसंबंधीत असणार असे नाही तर तो कोण होता रजिस्ट्रेशन न करणारा व्यक्ती कोण कुठली ड्युटी

**जुबेर इनामदार :-**

मला वाटते सकाळी ११.३० वाजता आपल बोलण झाल होत.

**मा. आयुक्त :-**

कोण कोण होते ड्युटी वर आता माझ्यापुढे रिपोर्ट घेऊन ये. आता यापुढे रजिस्ट्रेशन नाक्यावर झाल नाही. फॉर्म जागेवरच भरून घ्यायच. इथ जा तिथ जा. त्यांना सांगायच ही कागद लागतात. परंतु दररोज रजिस्ट्रेशन कस होत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आयुक्त साहेब नाक्यावर आता वेगळ सिस्टम चालू आहे. रजिस्ट्रेशन सोडून द्या. रजिस्ट्रेशनच्या मागे कोण पडतच नाही. कोणाला ती भानगड करायचीच नाही. जर एखादी गाडी आली विदाऊट एन्ट्री करून जायच असेल त्यांना काहीतरी चहापाणी द्या. विदाऊट एन्ट्री करून घ्या. एकदम खुले आम सिस्टम चालू आहे. नाक्यावरची बिलाची एन्ट्री करतात ना. त्याला एन्ट्री करायची नसेल तर त्याला २००-५०० द्या आणि तुम्ही जावा एकदम खुले आम चालू आहे. आता त्यात व्यापारी लोक काय म्हणतात.

**जुबेर इनामदार :-**

चालू म्हणजे कालचा विषय म्हणजे माझ्यासमोर स्पष्ट आहे व्यक्ति परिचयाची आहे. त्याची तयारी झाली होती. त्याप्रकारे करून घ्या. आपणच त्याला अडकवल

**मदन उदितनारायण सिंह :-**

म्हणजे ऑक्ट्राय असताना व्यापारी लोक जेवढे पैसे देत होते. त्याच्यापेक्षा जास्त आता देतात की एन्ट्री न करण्याचे २००-५०० दिले गाडी घेऊन गेले.

**मा. आयुक्त :-**

ती यादी दे मला नाक्यावर कोणा कोणाला

**याकुब कुरेशी :-**

मी काय बोलतो असे वरवरती बोलण्यापेक्षा तुम्ही पुरावा द्या ना. म्हणजे त्याच्याविषयी काय तरी कारवाई करता येईल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

कोण व्यापारी पुरावा देत नाही. कारण त्यांना नेहमी यायच आहे. फायदा आहे ना. म्हणजे फायदा तोटा त्याला समजत नाही त्याला ते इजी वाटते. आपण २००-५०० दिले गाडी घेऊन गेलो कोण ती कटकट करते. आणि ते लोक काय म्हणतात जेवढी तुमची बिलाची एन्ट्री वाढली. तेवढा तुम्हाला एलबीटी जास्त लागेल. अशी भीती दाखवून ते पैसे घेतात म्हणजे बिलाची एन्ट्री करून तू आम्हाला कायतरी द्या आणि तुम्ही जावा. अशी भिती दाखवून ते पैसे घेतात प्रत्येक गाडीवाल्याकडून

**जुबेर इनामदार :-**

साहेब मुंबईवरून डायरेक्ट गाड्या येतात त्याची एन्ट्री रजिस्ट्रेशन डायरेक्ट होते. त्याच्या एलबीटीच काय .

**मा. आयुक्त :-**

रजिस्ट्रेशन झालेले लोक भरतात. आम्ही नोटीस काढलेली आहे. दोन टक्के पॅनल्टी रजिस्ट्रेशन झाल्यानंतरच नोटिस.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आपल्या ठाण्यामध्ये जेव्हा ऑक्ट्राय चालू असतो तेव्हा रजिस्ट्रेशन होत नव्हत. ऑक्टॉयची जोपर्यंत रिसीट दाखवत नव्हते तिथे रजिस्ट्रेशन करायचे नाहीत. नंबरच देत नाहीत.

**मा. आयुक्त** :- म्हणजे

**जुबेर इनामदार :-**

आता हा कशाप्रमाणे तो मॅनेज केला होता. आपल्या ठेकेदारानी ते मला माहीत नाही. हे नक्की होत जोपर्यंत आपण ऑक्ट्रायची भरलेली पावती देत नाहीत तोपर्यंत रजिस्ट्रेशन नंबर रिलीज करायचे नाहीत.

**मा. आयुक्त :-**

म्हणजे गाड्याच्या संदर्भात.

**दादासाहेब खेत्रे :-**

आम्ही आर.टी.ओ. ला पत्र दिलेले आहे. त्यांनी पत्र पाठविले की आम्हाला असे बंधनकारक नाही आहे.

**मा. आयुक्त :-**

सदस्य सांगण्यापूर्वी तुम्ही का नाही सांगितले की आपल्याकडे डिलरशिप लोकांचे रजिस्ट्रेशन झाले काय?

**जुबेर इनामदार :-**

मिरा भायंदरचे डिलर असतील. त्याचच रजिस्ट्रेशन होईल. मुंबईचे डिलर काय करतील. रजिस्ट्रेशन केल्यानंतर

**मा. आयुक्त :-**

मा. आयुक्त ठाण्याच्या डिलरने आणि मुंबईच्या डिलरने किती गाड्या रजिस्ट्रेशन केल्या त्याची यादी मागवा. लोकल बॉडी टॅक्स लागल्यापासून किती गाड्या लोकांनी आणल्या त्याची यादी मागवा म्हणजे कोणाची वसुली झाली कोणाची झाली नाही आणि कुठल्या डिलरची ते सांगता येईल.

**जुबेर इनामदार :-**

साहेब ब-याच गाड्या आहेत शहरामध्ये असा प्रकार आहे.

**मा. आयुक्त :-**

गाड्या आणणा-या व्यक्तीकडे आपण मागवू शकत नाही.

**जुबेर इनामदार :-**

डीलर कडून घेता येईल पण साहेब डिलरकडून मिळणार नाहीत ते आरटीओ कडून मागवावी लागेल. आपल्याकडे जे एमएच०४ ठाणा आरटीओ तेथूनच आपल्या माहिती मिळेल.

**मा. आयुक्त :-**

ती यादी आणून माहिती देतो. यादी मागवून घ्या. ते बाहेर राहत असले आणि बिझनेस इथ चालू असला तर त्यांना सुध्दा रजिस्ट्रेशन करायला लागेल. बॉम्बे डिलरला आणि ठाणे डिलरला असं सिध्द करू शकतो की आरटीओ कडे किती रजिस्ट्रेशन झाले आहेत त्याची यादी आणून कुठल्या कुठल्या गाडीचे पैसे वसुल केले हे बघितल्याशिवाय तुम्ही अस सांगू शकत नाही ते येऊन पैसे भरतात म्हणून.

**जुबेर इनामदार :-**

साहेब मुंबई रजिस्ट्रेशन झाल्यावर तुम्ही काय करू शकत नाही. ठाणा आरटीओ जी आहे. एमएच०४ तेथे लागू झाला म्हणजे.

**मा. आयुक्त :-**

या केसमध्ये खरेदीदाराला आम्ही पकडू शकत नाही. खरेदीदाराचा तो बिझनेस नाही. वापरसाठी आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब ऐकून घ्या एमएच०४ जो ठाण्यामध्ये रजिस्टार होते. खरेदीदार मिरा भाईंदरचे असले तर साहेब तुम्हाला त्याच्याकडून घ्यायला लागेल.

**मा. आयुक्त :-**

हा मुद्दा वेगळा आहे. रजिस्ट्रेशन नंबर घेऊन तुम्ही व्हेरीफाय करायच आहे. ज्या डिलरकडून रक्कम आली नाही. त्या डिलरला पकडायच. डिलरचा व्यवसाय आहे आणि आपण खरेदीदार जो आहे तो गि-हाईक वापरासाठी आणलेला आहे तो विक्रीसाठी आणलेला नाही. आता कुठलाही माल आला. साखर आली, तांदूळ आला त्यांनी आणला आणि विक्रीसाठी ठेवला तर लोकल बॉडी टॅक्समध्ये समजा एखाद्याने बाजार करून आत आला तर तो एलबीटी साठी लायबल नाही.

**अनिल सावंत :-**

किंवा तुम्ही आरटीओला कळवू पण शकता. मिरा भाईंदरचे विदाऊट पे एलबीटी रजिस्ट्रेशन करू नका म्हणून.

**मा. आयुक्त :-**

ते डिलरकडून वसुल करायचे.

**अनिल सावंत :-**

रजिस्ट्रेशन करू नका म्हणून. ऑक्ट्राय कस ते विदाऊट ऑक्ट्रॉय करत नव्हते.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आयुक्त साहेब आपण कुठली वस्तु उपयोगासाठी आणली. विक्रीसाठी नाही तर त्याच्यावर एलबीटी लागू नाही ना.

**मा. आयुक्त :-**

आता आम्ही तुम्हाला तांदुळ धान्य हे सांगितल धान्यावर आपण माफ केल आहे. दहा पैसे किलो मग आलेले गि-हाईक कस भरणार.

**मदन उदितनारायण सिंह :-**

हो साहब वापर वरती आहे की नाही आता आपण म्हटल वापर वरती नाही.

**मा. आयुक्त :-**

वापर म्हणजे पाच किलो दहा किलो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

घरच्या काही वस्तू इलेक्ट्रोनिक्स म्हणजे टीव्ही वैगेरे आणल तर वापरसाठी पण घेतो.

**मा. आयुक्त :-**

आरटीओची यादी मागव पुढच्या मिटींगला ठेव.

**जुबेर इनामदार :-**

साहेब मिटींगमध्ये नाही आणली तरी त्याचा काही प्रॉब्लेम नाही.

**मा. आयुक्त :-**

नाही नाही तुम्हाला कुठली वस्तूची वसुली केली कुठली नाही हे सगळ कळेल ना.

**जुबेर इनामदार :-**

साहेब शहरामध्ये आपलीच लोक आहेत हा विषय चर्चेमध्ये असतो साहेब. विदाऊट रजिस्ट्रेशन चालू आहे. आरटीओ कडून यादी घ्यायला लागेल मिरा भाईंदर शहरामध्ये जी लोक राहतात त्या लोकांनी ठाण्यामध्ये डीलर आहेत मुंबईमध्ये डिलर आहेत. त्यांना रजिस्ट्रेशन ठाण्यामध्ये कराव लागते की कारण ॲड्रेस इथला लागतो. आपला रेव्हेन्यु आहे तो आला पाहिजे.

**मा. सभापती :-**

साहेब ठराव वाचतो. प्रकरण ३७ वार्षिक खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब आता सप्टेंबर आहे. महिना जवळ-जवळ संपत आला. सहा महिने झाले १०-११ सुरू होऊन. आणि आज आम्हाला नऊ-दहाच जमा खर्च आज मिळतो मग या सहा महिन्याच्या जमा खर्चाच काय जमाखर्चाचा आढावा घ्यायचा कसला आढावा घेणार गेल्यावर्षी मार्च ते एप्रिल काय केल आणि काय नाही केल ते आता उगळून काढायच. म्हणजे सगळेच अडचणीत येतील.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक मिटींगमध्ये चर्चा झाली. आणि पुढच्या मिटींगला ठेवा असे तीन वेळा सांगितले.

**अनिल सावंत :-**

हे आम्ही करतो पण या सहा महिन्याच काय आम्हाला तीन महिन्याच तर द्या एप्रिल ते जून तपासायला किती दिवस लागतात. एप्रिल ते जून संपून तीन महिने झाले.

**मा. आयुक्त :-**

या सहा महिन्याच मी देऊन टाकतो. नाही पण केव्हा देणार ते सांगा ना.

**जुबेर इनामदार :-**

सन २००९-२०१० या व्दितीय वर्षातील मंजूर अंदाजपत्रका नुसार प्रत्यक्ष जमा झालेल्या रक्कमा व त्यानुसार खर्च झालेल्या रक्कमांचे सन २००९-२०१० या वित्तीय वर्षाचे वार्षिक जमा खर्चास आजची सभा मंजूरी देत आहे.

**अनिता पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वांमध्ये मंजूर आहे.

**प्रकरण क्र. :- ६७**

वार्षिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**ठराव क्र. ५९ :-**

सन २००९-२०१० या व्दितीय वर्षातील मंजूर अंदाजपत्रका नुसार प्रत्यक्ष जमा झालेल्या रक्कमा व त्यानुसार खर्च झालेल्या रक्कमांचे सन २००९-२०१० या वित्तीय वर्षाचे वार्षिक जमा खर्चास आजची सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- सौ. अनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण ६८, निविदांना मंजूरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब आपल्या मान्यतेने बोलतो, राम मंदिर जी काम शहरामध्ये चालू आहेत ते होणे गरजेच आहे. तर ४ ही प्रभागामध्ये जेवढी काही कामे आहेत त्यांचा तो विषय आहे तोसुध्दा सामावेश करून घेण्यात यावा. नवघरमध्ये तो मार्केट बांधला ते महासभेमध्ये टेंडर झालेलाच आहे. त्याचा समावेश करून घेण्यात यावा.

**अनिल सावंत :-**

आपल्या मेनरोडच केल आता. ते मेनरोडच करतात.

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांची या गोष्टीला मान्यता आहे ना. ती कामे पॅचवर्कची ह्याच निविदेमध्ये सामावेश करून घ्यायच.

**चंद्रकात मोदी :-**

साहेब, पैचवर्क शांती नगरमे नही करते हे तो उसको भी समावेश किजिये।

**मा. सभापती :-**

वह मुद्दा अभी नही है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

फक्त मेन रोड झालेले आहेत. पण बाकीचे रोड झालेले नाही ना. मग, गणपती तिकडून जाणार आहेत ना. अंतर्गत रस्ते काहीच झालेले नाही.

**अनिल सावंत :-**

ते करण्यासाठी मान्यता द्यायची आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला ह्याच निविदेमध्ये समावेश करून घ्यायचा आहे तर सर्व सदस्यांची मान्यता आहे का?

**जुबेर इनामदार :-**

| **अ.क्र.** | **कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव** | **अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर** |
|---|---|---|
| १ | राई येथे राम मंदिर उदयानाची दुरुस्ती करणे. | रू. १४,६५,५००/- |
| | **१) मे. एस. एस. इंटरप्रायजेस** | **८.०० % कमी दराने** |
| | २) मे. अमेय कंन्स्ट्रक्शन | ७.०० % कमी दराने |
| | ३) मे. आयुशी इंटरप्रायजेस | ५.०० % कमी दराने |
| | ४) मे. राजेश्री इंटरप्रायजेस | ६.८ % जास्त दराने |
| | ५) मे. श्री गणेश इंटरप्रायजेस | ८.०० % जास्त दराने |
| | ६) मे. श्री. साई गणेश कंन्स्ट्रक्शन | ९.२ % जास्त दराने |

वरीलपैकी **मे. एस.एस इंटरप्रायजेस** यांची अंदाज पत्रकातील दरापेक्षा **८.००%** कमी दराची निविदा मंजूर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| २ | भाईंदर (पूर्व) नवघर तलावाच्या शेजारी मार्केट शेड बांधणे. | रू.१,३१,२९,७८४/- |
| | १) मे. एकता कंन्स्ट्रक्शन | **२.०० % कमी दराने** |

अ.क्र. २ च्या कामी **मे. एकता कंन्स्ट्रक्शन** यांची २.०० % कमी दराची निविदा वाजवी असून सदर निविदा मंजूर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| ३ | प्रभाग समिती क्र. १ मधील रस्ते दुरूस्ती करणे. | रू.१,००,००,०००/- |
| | १) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | ३.०० % जास्त दराने |
| | **दरवाटाघाटीनंतर** | **अंदाजपत्रकिय दराची** |
| | २) मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन | ८.०० % जास्त दराने |
| | ३) मे. रतनसिंग ॲन्ड ब्रदर्स | ९.०० % जास्त दराने |
| ४ | प्रभाग समिती क्र. २ मधील रस्ते दुरूस्ती करणे. | रू.१,००,००,०००/- |
| | **१) मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन** | ३.०० % जास्त दराने |
| | **दरवाटाघाटीनंतर** | **अंदाजपत्रकिय दराची** |
| | **२) मे. रतनसिंग ॲन्ड ब्रदर्स** | ३.०० % जास्त दराने |
| | **दरवाटाघाटीनंतर** | **अंदाजपत्रकिय दराची** |

| | | |
|---|---|---|
| | ३) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | ६.०० % जास्त दराने |
| ५ | प्रभाग समिती क्र. ३ मधील रस्ते दुरूस्ती करणे.<br>**१) मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन**<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**२) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन**<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>३) मे. रतनसिंग ॲन्ड ब्रदर्स | रू.१,००,००,०००/-<br>३.०० % जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराची**<br>३.०० % जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराची**<br>६.०० % जास्त दराने |
| ६ | प्रभाग समिती क्र. ४ मधील रस्ते दुरूस्ती करणे.<br>१) मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>२) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. रतनसिंग ॲन्ड ब्रदर्स | रू.१,००,००,०००/-<br>३.०० % जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराची**<br>८.०० % जास्त दराने<br>९.०० % जास्त दराने |

वरील पैकी अं.क्र. २ च्या कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन कं. यांची अंदाजपत्रक दराची निविदा, अं.क्र. ३ च्या कामी मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन व मे. रतनसिंग ॲन्ड ब्रदर्स यांची अंदाजपत्रकातील दराची निविदा, अं.क्र. ४ च्या कामी मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन व मे. कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराची निविदा व अ.क्र. ५ च्या कामी मे. श्री.जी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराची निविदा मंजूर करण्यात येत आहे. तसेच सन २००९-१० या वर्षात रस्ते दुरुस्ती करीता मा. महासभा दि.३१/३/२०१० अन्वये प्राप्त प्रशासकीय व आर्थिक मान्यते प्रमाणे व मा. स्थायी समिती सभा दि.२२/५/२००९ ठराव क्र.०७ अन्वये नेमलेल्या ठेकेदाराकडून मंजूर दरानूसार काम करुन घेण्यास वरील प्रमाणे अ.क्र. २ ते ५ ची निविदाप्रमाणे ठेकेदार नेमेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

तसेच ठेकेदारांची वेळोवेळी देयके प्रदानास देखिल ही सभा मान्यता देत आहे.

| ७ | भाईंदर (प) येथिल प्रभाग कार्यालय क्र. ०१ च्या तळमजल्यावरील असलेले गाळा क्र. ०४ भाडयाने देणे . | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | शकिल शब्बीर कुरेशी |
| **अ.क्र.** | **गाळा क्र.** | **प्रयोजन** | **क्षेत्रफळ** | **मासिक भाडे** |
| १ | ०४ | चिकन / मटन विक्रीसाठी | ४५.७३ चौमी | रू. ८००/- प्रति महिना |

| ८ | भाईंदर (प) येथिल प्रभाग कार्यालय क्र. ०१ च्या तळमजल्यावरील असलेले गाळा क्र. ०५ भाडयाने देणे . | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | असलम शब्बीर कुरेशी |
| **अ.क्र.** | **गाळा क्र.** | **प्रयोजन** | **क्षेत्रफळ** | **मासिक भाडे** |
| १ | ०४ | चिकन / मटन विक्रीसाठी | ४५.७३ चौमी | रू. ८००/- प्रति महिना |

अ.क्र. ७ च्या कामी मे. शकिल शब्बीर कुरेशी यांची रू. ८००/- प्रति महिना भाडे, अ.क्र. ८ च्या कामी मे. असलम शब्बीर कुरेशी यांची रू. ८००/- प्रति महिना भाडे रक्कम स्वीकारण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**याकुब कुरेशी :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ६८ :-**

निविदांना मंजूरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ६० :-**

| **अ.क्र.** | **कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव** | **अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर** |
|---|---|---|
| १ | राई येथे राम मंदिर उदयानाची दुरुस्ती करणे.<br>**१) मे. एस. एस. इंटरप्रायजेस**<br>२) मे. अमेय कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. आयुशी इंटरप्रायजेस<br>४) मे. राजेश्री इंटरप्रायजेस<br>५) मे. श्री गणेश इंटरप्रायजेस<br>६) मे. श्री. साई गणेश कंन्स्ट्रक्शन | रू. १४,६५,५००/-<br>**८.०० % कमी दराने**<br>७.०० % कमी दराने<br>५.०० % कमी दराने<br>६.८ % जास्त दराने<br>८.०० % जास्त दराने<br>९.२ % जास्त दराने |

वरीलपैकी **मे. एस.एस इंटरप्रायजेस** यांची अंदाज पत्रकातील दरापेक्षा **८.००%** कमी दराची निविदा मंजूर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| २ | भाईंदर (पूर्व) नवघर तलावाच्या शेजारी मार्केट शेड बांधणे.<br>१) मे. एकता कंन्स्ट्रक्शन | रू.१,३१,२९,७८४/-<br>**२.०० % कमी दराने** |

अ.क्र. २ च्या कामी **मे. एकता कंन्स्ट्रक्शन** यांची २.०० % कमी दराची निविदा वाजवी असून सदर निविदा मंजूर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| ३ | प्रभाग समिती क्र. १ मधील रस्ते दुरूस्ती करणे.<br>१) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>२) मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. रतनसिंग ॲन्ड ब्रदर्स | रू.१,००,००,०००/-<br>३.०० % जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराची**<br>८.०० % जास्त दराने<br>९.०० % जास्त दराने |
| ४ | प्रभाग समिती क्र. २ मधील रस्ते दुरूस्ती करणे.<br>**१) मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन**<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**२) मे. रतनसिंग ॲन्ड ब्रदर्स**<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>३) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | रू.१,००,००,०००/-<br>३.०० % जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराची**<br>३.०० % जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराची**<br>६.०० % जास्त दराने |
| ५ | प्रभाग समिती क्र. ३ मधील रस्ते दुरूस्ती करणे.<br>**१) मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन**<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**२) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन**<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>३) मे. रतनसिंग ॲन्ड ब्रदर्स | रू.१,००,००,०००/-<br>३.०० % जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराची**<br>३.०० % जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराची**<br>६.०० % जास्त दराने |
| ६ | प्रभाग समिती क्र. ४ मधील रस्ते दुरूस्ती करणे.<br>१) मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>२) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. रतनसिंग ॲन्ड ब्रदर्स | रू.१,००,००,०००/-<br>३.०० % जास्त दराने<br>**अंदाजपत्रकिय दराची**<br>८.०० % जास्त दराने<br>९.०० % जास्त दराने |

वरील पैकी अं.क्र. २ च्या कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन कं. यांची अंदाजपत्रक दराची निविदा, अं.क्र. ३ च्या कामी मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन व मे. रतनसिंग ॲन्ड ब्रदर्स यांची अंदाजपत्रकातील दराची निविदा, अं.क्र. ४ च्या कामी मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन व मे. कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराची निविदा व अ.क्र. ५ च्या कामी मे. श्री.जी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराची निविदा मंजूर करण्यात येत आहे. तसेच सन २००९-१० या वर्षात रस्ते दुरुस्ती करीता मा. महासभा दि.३१/३/२०१० अन्वये प्राप्त प्रशासकीय व आर्थिक मान्यते प्रमाणे व मा. स्थायी समिती सभा दि.२२/५/२००९ ठराव क्र.०७ अन्वये नेमलेल्या ठेकेदाराकडून मंजूर दरानूसार काम करुन घेण्यास वरील प्रमाणे अ.क्र. २ ते ५ ची निविदाप्रमाणे ठेकेदार नेमेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

तसेच ठेकेदारांची वेळोवेळी देयके प्रदानास देखिल ही सभा मान्यता देत आहे.

| | | |
|---|---|---|
| ७ | भाईंदर (प) येथिल प्रभाग कार्यालय क्र. ०१ च्या तळमजल्यावरील असलेले गाळा क्र. ०४ भाडयाने देणे . | |

| | | | | शकिल शब्बीर कुरेशी |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **गाळा क्र.** | **प्रयोजन** | **क्षेत्रफळ** | **मासिक भाडे** |
| १ | ०४ | चिकन / मटन विक्रीसाठी | ४५.७३ चौमी | रू. ८००/- प्रति महिना |

| | | |
|---|---|---|
| ८ | भाईंदर (प) येथिल प्रभाग कार्यालय क्र. ०१ च्या तळमजल्यावरील असलेले गाळा क्र. ०५ भाडयाने देणे . | |

| | | | | असलम शब्बीर कुरेशी |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **गाळा क्र.** | **प्रयोजन** | **क्षेत्रफळ** | **मासिक भाडे** |
| १ | ०४ | चिकन / मटन विक्रीसाठी | ४५.७३ चौमी | रू. ८००/- प्रति महिना |

अ.क्र. ७ च्या कामी मे. शकिल शब्बीर कुरेशी यांची रू. ८००/- प्रति महिना भाडे, अ.क्र. ८ च्या कामी मे. असलम शब्बीर कुरेशी यांची रू. ८००/- प्रति महिना भाडे रक्कम स्वीकारण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. याकुब कुरेशी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६९, सन २०१०-११ या आर्थिक वर्षात उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागासाठी उद्याने, स्मशाने, मैदाने व दुतर्फा रोडच्या कडेला वृक्षारोपण करणेकरीता लालमाती व सफेद रेती खरेदी करणेकामी प्राप्त निविदांना मंजूरी मिळणेबाबत.

**सुधा व्यास :-**

मा. सभापती साहेब सफेद रेती खरीदनेके प्रकरण अंतर्गत खरेदी-विक्री लिलाव के लिए मा. उच्च न्यायालय के आदेशानुसार राज्यशासनने स्थगिती दी है। फिर भी सफेद रेती की निविदा निकालने के लिए प्रशासन का क्या हेतु है? यह मा. स्थायी समितीमे स्पष्टीकरण दिजीए। सफेद रेती निकालने के बारेमे प्रशासन का हेतू क्या है? हेतू उनको बतानेका

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

स्थगिती के बारे मे हमारे पास कुछ आदेश नही है। आपके पास कुछ आदेश है क्या।

**सुधा व्यास :-**

आपके पास आदेश नही है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

हमारे पास ऐसा कुछ आदेश नही है, शासन के तरफसे।

**सुधा व्यास :-**

रेती विक्रि की सदर निविदा अंतर्गत ठेकेदार की रेती विक्रि की सभी परिक्षण के प्रमाणपत्र मा. स्थायी समितीके सामने प्रस्तुत की जाएगी यह मेरी विनंती है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

रॉयल्टी भरती है। शासन का परवानगीसे रॉयल्टी भरते है। अभी अटीशर्ती नही करेंगे करारनामा करेंगे। इसमे रॉयल्टी मिलते ही रेती लायेगी।

**सुधा व्यास :-**

इसमे परमिशन जाच की लि गई है क्या? परमिशन का प्रमाणपत्र आपको दिये है क्या?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

निविदा मंजुर होने के बाद करेंगे। अटी आपण ठरावामध्ये लिहितो. विदाऊट रॉयल्टी चे आपण अटी शर्ती टाकत नाही. उद्या नाही भरले तर आपण जिम्मेदार असतो.

**सुधा व्यास :-**

इस काम के लिए कितनी लाल मिट्टी और सफेद मिट्टी आयी है? उसका रेट किस प्रकार किया गया है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

आपण रेट मंजुर करून घेतो. आवश्यकतेनुसार आपण ते वापरतो. आपण आज रेट फिक्स करणार.

**नागेश ईरकर :-**

आपण स्थायी समितीची मंजूरी घेतो. आणि ज्यावेळेला तिकडे जेवढी आवश्यकता लागत असेल तिकडे आपण टाकतो.

**सुधा व्यास :-**

पर ठेकेदार की रॉयल्टी प्रमाणपत्र....

**नागेश ईरकर :-**

आपण जेव्हा रॉयल्टी सादर करतो. तेव्हा त्यावेळेला आपण ते तपासुन बघतो.

**अनिल सावंत :-**

वरील विषयानुसार आपणांस विनंतीपूर्वक कळवितो की, उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरीता सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिकेने विकसित केलेली ३६ उद्याने, १३ स्मशाने, २ चौपाट्या, ६ मैदाने व ११ कि.मी. लांबीचे डिवायंडर येथे लाल मातीची आवश्यकता भारणार आहे. तसेच पावसाळ्यामध्ये झाडांच्या मुळातून माती निघून गेल्याने तिथे लाल मातीचा भराव करुन झाडाच्या सभोवताल पाणी साठण्याकरीता आळी करणे गरजेचे आहे. पावसाळ्यामध्ये वृक्षारोपण कार्यक्रमासाठी, मैदानावर गवत लावण्यासाठी तसेच उद्याने व स्मशाने येथे रॉक गार्डन बनविणे, शोभिवंत झाडांना मातीची भरणी करणे, उद्याने, स्मशाने, चौपाट्या येथील

सभोवताल असलेला गोल्डन ड्युरंटा व साईडला असलेली इतर झाडांना माती भराव करण्यासाठी लाल मातीची गरज भासते. तसेच मा. नगरसेवक तथा वृक्षप्राधिकरण समिती सदस्य यांनी नर्सरीमध्ये सब्जा, झेंडू, तुळस व वनीकरणाची रोपे तयार करण्यात यावी असे सुचविलेले असून रोपे तयार करण्याकरीता प्लास्टीक पिशवीमध्ये लाल माती भरपूर प्रमाणात लागणार आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकसित केलेल्या उद्यानांमध्ये लोक आपल्या कुटूंबा समवेत मनोरंजनाकरीता येत असतात. सदर उद्यानामध्ये वेगवेगळ्या प्रकारची आधुनिक खेळणी बसविलेली आहेत व उद्यानामध्ये लहान मुलांची खेळण्यासाठी भरपुर गर्दी होते. त्याकरीता खेळण्याखाली व सभोवताली सफेद रेती टाकल्याने खेळण्यास येणाऱ्या मुलांना खेळण्यावर खेळताना जमिनीचा जोरात मार लागून दुखापत होऊ नये त्याकरीता सफेदरेती मागविणे जरुरीचे आहे.

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात **माती, सफेदरेती** या लेखाशिर्षाखाली ३०.०० लाखाची तरतुद केलेली असुन लाल माती व सफेद रेतीची गरज पाहता मा. वृक्षप्राधिकरण समिती सभेमध्ये दि. ३१/०५/२०१० ठराव क्र. ४० अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार दि. १७/०७/२०१० रोजी दै. वृत्तमानस, दै. फ्रि प्रेस या वृत्तपत्रात व ई-टेंडरिंग वेबसाईट www.mbmc.abcprocure.com वर जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. परंतु, दि. २१/०७/२०१० रोजी प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे मा. आयुक्त सो., यांच्या दि. २४/०७/२०१० रोजीच्या मान्यतेने दि. २९/०७/२०१० रोजी दै. लोकमत, दै. फ्रि प्रेस व दै. समाधी प्रकाश या वृत्तपत्रात व ई-टेंडरिंग वेबसाईट www.mbmc.abcprocure.com वर जाहिर फेर निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. भुषण ट्रान्सपोर्ट | मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट | मे. गणेश डेव्हलपर्स |
|---|---|---|---|---|
| १ | लाल माती | **रु. १३५५/- प्र. ब्रास** | रु. १६८०/- प्र. ब्रास | रु. १४८०/- प्र. ब्रास |
| २ | सफेद रेती | **रु. ३८५०/- प्र. ब्रास** | रु. ५२१०/- प्र. ब्रास | रु. ४५००/- प्र. ब्रास |

वर्षभरामध्ये उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, दुभाजक, नर्सरी तसेच वृक्षारोपणासाठी इ. ठिकाणी लाल माती व उद्यानातील खेळण्याखाली टाकण्याकरीता सफेदरेतीची आवश्यकता असते. तरी वरील कमी दराची निविदा स्विकारणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास व निविदेस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वांनुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ६९ :-**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागासाठी उद्याने, स्मशाने, मैदाने व दुतर्फा रोडच्या कडेला वृक्षारोपण करणेकरीता लालमाती व सफेद रेती खरेदी करणेकामी प्राप्त निविदांना मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ६१ :-**

वरील विषयानुसार आपणांस विनंतीपूर्वक कळवितो की, उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरीता सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिकेने विकसित केलेली ३६ उद्याने, १३ स्मशाने, २ चौपाट्या, ६ मैदाने व ११ कि.मी. लांबीचे डिवायंडर येथे लाल मातीची आवश्यकता भारणार आहे. तसेच पावसाळ्यामध्ये झाडांच्या मुळातून माती निघून गेल्याने तिथे लाल मातीचा भराव करुन झाडाच्या सभोवताल पाणी साठण्याकरीता आळी करणे गरजेचे आहे. पावसाळ्यामध्ये वृक्षारोपण कार्यक्रमासाठी, मैदानावर गवत लावण्यासाठी तसेच उद्याने व स्मशाने येथे रॉक गार्डन बनविणे, शोभिवंत झाडांना मातीची भरणी करणे, उद्याने, स्मशाने, चौपाट्या येथील सभोवताल असलेला गोल्डन ड्युरंटा व साईडला असलेली इतर झाडांना माती भराव करण्यासाठी लाल मातीची गरज भासते. तसेच मा. नगरसेवक तथा वृक्षप्राधिकरण समिती सदस्य यांनी नर्सरीमध्ये सब्जा, झेंडू, तुळस व वनीकरणाची रोपे तयार करण्यात यावी असे सुचविलेले असून रोपे तयार करण्याकरीता प्लास्टीक पिशवीमध्ये लाल माती भरपूर प्रमाणात लागणार आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकसित केलेल्या उद्यानांमध्ये लोक आपल्या कुटूंबा समवेत मनोरंजनाकरीता येत असतात. सदर उद्यानामध्ये वेगवेगळ्या प्रकारची आधुनिक खेळणी बसविलेली आहेत व उद्यानामध्ये लहान मुलांची खेळण्यासाठी भरपुर गर्दी होते. त्याकरीता खेळण्याखाली व सभोवताली सफेद रेती टाकल्याने खेळण्यास येणाऱ्या मुलांना खेळण्यावर खेळताना जमिनीचा जोरात मार लागून दुखापत होऊ नये त्याकरीता सफेदरेती मागविणे जरुरीचे आहे.

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात **माती, सफेदरेती** या लेखाशिर्षाखाली ३०.०० लाखाची तरतुद केलेली असुन लाल माती व सफेद रेतीची गरज पाहता मा. वृक्षप्राधिकरण समिती सभेमध्ये दि. ३१/०५/२०१० ठराव क्र. ४० अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार दि. १७/०७/२०१० रोजी दै. वृत्तमानस, दै. फ्रि प्रेस या वृत्तपत्रात व ई-टेंडरिंग वेबसाईट www.mbmc.abcprocure.com वर जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. परंतु, दि. २१/०७/२०१० रोजी प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे मा. आयुक्त सो., यांच्या दि. २४/०७/२०१० रोजीच्या मान्यतेने दि. २९/०७/२०१० रोजी दै. लोकमत, दै. फ्रि प्रेस व दै. समाधी प्रकाश या वृत्तपत्रात व ई-टेंडरिंग वेबसाईट

www.mbmc.abcprocure.com वर जाहिर फेर निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. भुषण ट्रान्सपोर्ट | मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट | मे. गणेश डेव्हलपर्स |
|---|---|---|---|---|
| १ | लाल माती | **रु. १३५५/- प्र. ब्रास** | रु. १६८०/- प्र. ब्रास | रु. १४८०/- प्र. ब्रास |
| २ | सफेद रेती | **रु. ३८५०/- प्र. ब्रास** | रु. ५२१०/- प्र. ब्रास | रु. ४५००/- प्र. ब्रास |

वर्षभरामध्ये उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, दुभाजक, नर्सरी तसेच वृक्षारोपणासाठी इ. ठिकाणी लाल माती व उद्यानातील खेळण्याखाली टाकण्याकरीता सफेदरेतीची आवश्यकता असते. तरी वरील कमी दराची निविदा स्विकारणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास व निविदेस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७०, शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्या संबंधी विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ७० हा मा. आयुक्त साहेब येईपर्यंत शिल्लक ठेवतो. तोपर्यंत पुढील विषय घेण्यात यावा.

**नगरसचिव :-**

प्रकरण ७१, मा. आयुक्त सो., यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (सार्व. बांधकाम विभाग)

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ७१ अवलोकन मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७१ :-**

मा. आयुक्त सो., यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ६३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांना मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नांव | मंजुर दर |
|---|---|---|---|---|
| १ | जैसल पार्क चौपाटी रेल्वे कडील महानगरपालिकेचे मैदान विकसित करणे. (आमदार निधी) | रू. १०,००,०००/- | मे. आझाद मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २ | पेणकरपाडा येथील स्मशानभूमीतील अत्यावश्यक बांधकाम कामे करणे. (आमदार निधी) | रू. १०,००,०००/- | मे. शुभलक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ३ | मिरारोड (पूर्व) येथिल विजय पार्क जवळील लक्ष्मी व्हिजन ते अंकुर इमारती पर्यतचा रस्ता तयार करणे. (नगरसेवक निधी) | रू. ९,९८,७००/- | मे. श्रीरंग मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ४ | रा.म.क्र. ८ वरील काशी मनपा शाळेपाठीमागे आर.सी.सी. संरक्षक भिंत बांधणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९८,०००/- | मे. चंदना कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ५ | पेणकरपाडा येथिल प्रभाकर म्हात्रे यांचे घरापासून नताशापार्क कडे जाणारा रस्ता उंची वाढवून डांबरीकरण करणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९९,९००/- | मे. एम.एस. इंटरप्रायजेस | ०.०१ ऽ कमी दराने |
| ६ | घोडबंदर येथिल अंतर्गत सी.सी. रस्ते दुरुस्ती करुन पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९९,७००/- | मे. राठोड ब्रदर्स | अंदाजपत्रकीय दराने |
| ७ | काशी चर्च झोपडपट्टीमध्ये शौचालय बांधून मस्जीद ते शितलबाग पर्यंतचा रस्ता सी.सी. करुन पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९८,४००/- | मे. कंचन कंन्स्ट्रक्शन कं | अंदाजपत्रकीय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | प्रभाग क्र.७७ मधिल गावदेवी कंपाऊंड येथिल नाल्याच्या तळाचे क्रॉंक्रीटीकरण करुन बाभळीची भाट येथिल अंतर्गत रस्ते सी.सी. करणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९८,५००/- | मे. कंचन कंन्स्ट्रक्शन कं | अंदाजपत्रकीय दराने |
| ९ | मिरारोड (पूर्व) शांतीपार्क येथिल युनिक प्लाझा ते गोकुळ व्हिलेज पर्यंत गटार बांधणे. (नगरसेवक निधी) | रु.६,७४,५००/- | मे. राठोड ब्रदर्स | अंदाजपत्रकीय दराने |
| १० | प्रभाग क्र. ७१ मधिल विजयपार्क येथिल लक्ष्मी व्हीजन अंकूर एन्क्लेव्ह इमारतीकडे जाणारा रस्ता उंची वाढवून डांबरीकरण करणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९८,७००/- | मे. कंचन कंन्स्ट्रक्शन कं | अंदाजपत्रकीय दराने |
| ११ | प्रभाग क्र. ७९ पेणकरपाडा येथिल वर्तक आळी ते दत्तकृपा फ्लोअरमिल ते राधाकृष्ण जनरल स्टोर्स पर्यंतच्या रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९९,७००/- | मे. एम.एस. इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकीय दराने |
| १२ | मिरारोड पूर्व प्रभाग क्र. ६३ मधिल सृष्टी से.५ येथिल सुर्या शॉपींग सेंटर समोर बसस्टॉप बनविणे. (नगरसेवक निधी) | रु.३,२५,०००/- | मे. राठोड ब्रदर्स | कोटेशन दराने |
| १३ | प्रभाग क्र.७५ मधिल वेस्टर्न पार्क येथिल हलिमा अपार्ट ते अलयासर पर्यंत रस्ता खडीकरण करुन डांबरीकरण करणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९९,९००/- | मे. एम.एस. इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकीय दराने |
| १४ | काशिमिरा स्मशानभूमित बसण्यासाठी शेड बनवून इतर दुरुस्ती कामे करणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९८,५००/- | मे. साई कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| १५ | काशिगाव येथिल मनपा शाळेपाठीमागे संरक्षक भिंत बांधणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९८,०००/- | मे. चंदना कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| १६ | भाईंदर (प.) राई प्रभाग क्र.२८ येथे अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९८,५००/- | मे. एस.एस. इंटरप्रायजेस | ७.०० % कमी दराने |
| १७ | भाईंदर (प.) महेश नगर बिल्डींग समोर व अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९८,०००/- | मे. राठोड असोसिएट्स | अंदाजपत्रकीय दराने |
| १८ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. ३६, कोळीवाडयातील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९८,९००/- | मे. गुरूजी कंस्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| १९ | भाईंदर (प.) प्रभाग क्र.३० येथे भंडारी गल्ली व प्राथमिक शाळेजवळील कॉंक्रीट रस्ता दुरुस्ती करुन पेव्हर ब्लॉक बसंविणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९८,५००/- | मे. श्री गणेश इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकीय दराने |
| २० | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १९ मधील साईरत्नम येथे व दिपक नगर येथिल रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | रू. ६,००,०००/- | मे. राठोड असोसिएट्स | अंदाजपत्रकीय दराने |
| २१ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १८ मधील प्रशांत हॉटेल ते कमल कुंज अपा. व संजय ते वसुंधरा अपा. पर्यतच्या गटारावर पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | रू. ९,९०,०००/- | मे. श्री गणेश इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकीय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | मिरारोड वॉर्ड क्र. ५३ मध्ये अंजूमन स्कूल तसेच कृणाल शॉपिंग सेंटरच्या पाठीमागे गटारावर स्लॅब टाकणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ४,९९,५००/- | मे. मुस्कान इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| २३ | मिरारोड वॉर्ड क्र. ५२ मधील वैभव कॉम्पलेक्स पाठीमागील नाल्यावर स्लॅब टाकणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ५,००,०००/- | मे. केदारनाथ कंन्स्ट्रक्शन कं. | ४.९९ ऽ कमी दराने |
| २४ | मिरारोड वॉर्ड क्र. ५६ मधील अस्मिता होरिझोन ते अस्मिता क्रिझंट पर्यत गटारावर स्लॅब टाकणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ४,९५,०६०/- | मे. मुस्कान इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| २५ | मिरारोड वॉर्ड क्र. ५७ मधील गणेश मंदिर ते चंद्रेश महल पर्यत गटारावर पेव्हर ब्लॉक व कर्बस्टोन बसविणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ४,९९,९००/- | मे. मुस्कान इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| २६ | मिरारोड अस्मिता हाउुस समोरील दाउुद मंझिल पासून पुढे गटारावर पेव्हर ब्लॉक व कर्बस्टोन बसविणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ५,००,०००/- | मे. राठोड ब्रदर्स | अंदाजपत्रकिय दराने |
| २७ | मिरारोड वॉर्ड क्र. ५४ मधील संघवी पार्क ते निदा पार्क पर्यत गटारावर स्लॅब टाकणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ४,९५,९५०/- | मे. मुस्कान इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| २८ | मिरारोड वार्ड क्र.६५ मधील गटाराचे रूंदीकरणे करून पुर्नबांधणी करणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ४,९८,९५०/- | मे. यश इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| २९ | मिरारोड वॉर्ड क्र. ६६ मधील शांतिनगर से. २ सी – २७ ते अे – १० पर्यत गटाराचे रूंदीकरण करून पुर्नबांधणी करणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ५,००,०००/- | मे. साई कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ३० | मिरारोड शांतिनगर से. १० मधील सी – ४८ ते सी – ४६ पर्यत गटार रूंदीकरण करून पुर्नबांधणी करणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ४,९९,९००/- | मे. साई कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ३१ | मिरारोड वॉर्ड क्र. ६८ मधील शांतीनगर से. ९, सी – ६४ ते सी – ५८ पर्यत गटार रूंद करून पुर्नबांधणी करणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ५,००,०००/- | मे. केदारनाथ कंन्स्ट्रक्शन कं | ४.९९ ऽ कमी दराने |
| ३२ | मिरारोड (पूर्व) शांतीपार्क येथिल श्रध्दा टॉवर पासून पार्श्वनाथ दर्शन इमारती पर्यत गटार बांधून स्लॅब टाकणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ४,९९,५००/- | मे. केदारनाथ कंन्स्ट्रक्शन कं | ४.९९ ऽ कमी दराने |
| ३३ | मिरारोड (पूर्व) शांतीपार्क येथिल जांगीड शाळे जवळील गटार बांधून स्लॅब टाकणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ५,००,०००/- | मे. एम.एस. इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ३४ | मिरारोड (पूर्व) अस्मिता एस्कान ४ ते शांतिनगर से. ११ सी – ३६/३७ पर्यतचे गटार रूंद करणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ४,९९,५००/- | मे. केदारनाथ कंन्स्ट्रक्शन कं | ४.९९ ऽ कमी दराने |
| ३५ | भाईंदर (पूर्व) आझाद नगर गल्ली नं.२ मधील गटार बांधणे. (महापौर निधी) | रू. ९,९९,५००/- | मे. यश इंटरप्राईजेस | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३६ | भाईंदर (पूर्व) गोडदेव गावापासून राधासदन इमारती पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे.<br>(नगरसेवक निधी) | रु. ५,००,०००/- | मे. यश इंटरप्राईजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ३७ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ११ मधील शिवशक्ती नगर चाळी मधील मुख्य रस्त्यालगत गटार बांधणे.(नगरसेवक निधी) | रू. ९,९९,४००/- | मे. राठोड ब्रदर्स | ५.०५ ऽ कमी दराने |
| ३८ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ५१ मधील गोल्डन हार्वेस्ट पासून क्विन्स टुलीप पर्यत रस्ता डांबरीकरण करणे.<br>(नगरसेवक निधी) | रू. ९,९९,५००/- | मे. एकता कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ३९ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १३ मधील श्री. मोहन महादेव पाटील यांचे घरापासून श्री. मनोज म्हात्रे यांचे घरापर्यत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | रू. ९,९९,७००/- | मे. विराज कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ४० | मिरारोड वॉर्ड क्र. ६७ मध्ये शांतिनगर से. १० येथील मैदानात पाण्याची टाकी व जॉगिंग ट्रकचे बांधकाम करणे. (नगरसेवक निधी) | रू. ९,९९,५००/- | मे. एन.एस. इंटरप्रायजेस | ०.१ ऽ कमी दराने |
| ४१ | भाईंदर (प) प्रभाग क्र. ३४ येथे राधापार्क ते विजय होम कॉम्पलेक्स, अशोका अपार्ट ते गोविंद स्मृती अपार्टमेंट पर्यत गटारावर पेव्हर ब्लॉक बसविणे व मनोरमा अपा. ते तोडी उदयोग पर्यत सी.सी. रस्ता करून पेव्हर ब्लॉक बसविणे व अंतर्गत गटारे दुरूस्ती करणे. (नगरसेवक निधी) | रू. ९,९९,५००/- | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ४२ | भाईंदर (प) प्रभाग क्र. २४ वृजमाणिक नगर, गौतमनगर व शांतीनगर भागातील अंतर्गत गटारे नाले व स्लॅब दुरूस्ती करणे.<br>(नगरसेवक निधी) | रू. ९,९९,५००/- | मे. राठोड असोसिएट्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ४३ | भाईंदर (प) उत्तन रस्त्यावर एडवट कोरीया व डोंगरी तारोडी रस्त्यावर बर्नट नुनीस, ऑस्टीन नुनीस, एडवट नुन यांच्या घराच्या बाजूला संरक्षक भिंत तयार करणे. | रू. ४,६२,९००/- | मे. नवलाई मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ४४ | भाईंदर (प) प्रभाग क्र. २१ येथे मोदी पटेल रस्ता, नारायण नगर रस्ता व अंतर्गत रस्त्यावरील फुटपाथ दुरूस्ती करणे. | रू. ९,९५,०००/- | मे. शितलादेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ४५ | मिरारोड वॉर्ड क्र. ५२ मधील युवराज महाराजा इमारती पासून पुढील कच्च्या नाल्याचे बांधकाम करणे. | रू. ९,९९,८००/- | मे. विजय मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ४६ | भाईंदर (पूर्व) बालाजी धाम अपार्टमेंट पासून राज अपार्टमेंट पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रू. ९,९९,६००/- | मे. अनिश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. उल्हासनगर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ४७ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल डी.पी. रस्त्यावरील अंम्बिका कॉम्पलेक्स पासून मानसरोवर रिजेन्सी पर्यंत रस्त्यांचे | रू. ९,९८,५००/- | मे. आशा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. उल्हासनगर, जि. | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | डांबरीकरण करणे. | | ठाणे. | |
| ४८ | मिरारोड रस्साज सिनेमा जवळील महानगरपालिका इमारतीत तळ मजल्यावर आरोग्य केंद्रासाठी फर्निचरची कामे करणे. | रू. ८,८९,८००/- | मे. यशोधन मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. मुरबाड, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ४९ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ४७ मधील सुदामा नगर व साईसागर आणि एम.आय. उदयोगनगर मधील नाल्यावर संरक्षक भिंत बांधणे. | रू. ५,५८,६६०/- | मे. शितलादेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ५० | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक शाळागृह इमारती दुरूस्ती करणे. | रू. ९,९८,५००/- | मे. दुर्गा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ५१ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक उदयाने दुरूस्ती करणे. | रू. २,६६,८००/- | मे. श्रीगजानन मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ५२ | पाली येथे बिल्सन कावल्या यांच्या घराचे बाजुने गटार व क्रॉसिंग दुरूस्ती करणे. | रू. १,७५,२००/- | मे. श्रीगजानन मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ५३ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक स्मशानभुमी दुरूस्ती करणे. | रू. ५,००,०००/- | मे. शितलादेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ५४ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १७ मधील भाजी मार्केट रोड धनलक्ष्मी प्रेस्टीज इंड इस्टेट ते स्टार बिल्डींग स्टार इस्टेट पर्यत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे व भाईंदर (पूर्व) गुरू गोविंद इस्टेट येथे सी.सी. रस्ता तयार करणे. | रू. ५,००,०००/- | मे. एकता कंन्स्ट्रक्शन | ५.०० ऽ कमी दराने |
| ५५ | रा.म.क्र. ८ वरील हॉटेल साई पॅलेस जवळ संरक्षक भिंत बांधणे. | रु.९,९४,५००/- | मे. एम.एस. इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ५६ | प्र.क्र. ७५ मधिल डाचकूल पाडयाकडे जाणा-या रस्त्या लगत संरक्षक भिंत बांधणे. | रु.१०,००,०००/- | मे. एम.एस. इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ५७ | भाईंदर (प) टेंभा हॉस्पीटल येथील शवागृहा येथे जनरेटर सेंट बसविणे. | रू. ९,९८,५७६/- | मे. आदित्य इलेक्ट्रीकल्सृ | अंदाजपत्रकिय दराने |
| ५८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) येथे पुनम सागर, स्टेशन रोड, शितलनगर, रसाज सिनेमा इत्यादी ठिकाणी सेमी हायमास्ट पोल लावणे. | रु.९,११,८८६/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ५९ | भाईंदर (पूर्व) नवघर आरक्षण क्र.१०९ येथे गेट लॅम्प बसविणे व इतर आवश्यक कामे करणे. | रु.२,९५,०५१/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ६० | सिल्व्हर पार्क, भाईंदर (प.) खारीगांव प्रभाग कार्यालय, इंद्रलोक, भाईंदर जनता नगर आरोग्य चौकी, पेणकरपाडा बंदरवाडी, विनायक नगर, आरोग्य केंद्र, अमृतवाणी पाणपोई इत्यादी ठिकाणी विद्युत फिटींग करणे. | रु.३,६७,१४०/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ६१ | मिरारोड (पूर्व) सेक्टर ८,९,१० इत्यादी ठिकाणचे स्ट्रीट लाईट पोल दुरुस्ती व पॅनल बदलणे. | रु.२,८३,००६/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६२ | उत्तन चिखलखाडी व उत्तन मार्केट तसेच आंबेडकर नगर येथील व्यायामशाळा येथे विद्युत फिटींग करणे. | रु.१,२२,६८५/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ६३ | घोडबंदर मच्छी मार्केट येथे विद्युत फिटींग करणे. | रु.८७,१५९/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ६४ | मिरा एम.आय.डी.सी. पंम्पींग स्टेशन, सेक्टर नं. ०७ पाण्याची टाकी, अस्मिता पाण्याची टाकी इत्यादी ठिकाणी विदयुत फिटींग करणे. | रू. ५,१९,३१४/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ६५ | भाईंदर (पूर्व) नवघर रोडवरील आरक्षण क्र. १०९ मध्ये फाउंटन तयार करण्यासाठी फायबरची कामे करणे | रू. ९,०७,६००/- | मे. तिरूपती बालाजी इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ६६ | भाईंदर (पूर्व) नवघर रोडवरील गुरूव्दारा समोरील उद्यानामध्ये फाउंटन तयार करण्यासाठी विद्युत व विविध कामे करणे. | रु. ९,९८,९००/- | मे. तिरूपती बालाजी इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ६७ | भाईंदर (प.) गणेश देवल नगर येथील बालवाडी लगतच्या नाल्यावर रेलिंग करणे. | रु. २,३२,७००/- | मे. यश इंटरप्राईजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ६८ | उत्तन येथील भाजी मार्केट, मच्छी मार्केट, फुल मार्केट व मटन मार्केट दुरूस्ती करणे. | रू. ४,८०,०००/- | मे. एस.एस. इंटरप्रायजेस | ७.०० ऽ कमी दराने |
| ६९ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांवरती अतिरीक्त सुचना फलक बसविणे. | रू. ९,९३,२००/- | मे. एम.एस. इंटरप्रायजेस | कोटेशन दराने |

| SR. NO. | DESCRIPTION | PER | RATE |
|---|---|---|---|
| 1. | **ITEM NO. 1**<br><br>**Providing Cautionary Sign Boards 90 cm. equilateral triangle with apex point upward prepared on fibre reinforced plate 3.00 millimeter thick bonded with white retro retoreflective sheeting on Engineering grade having pressure sensitive / heat activated adhesive retoreflective white back ground and red border and back side gray, retoreflective symbols, letters numerals, arrows one M.S. angle post of 65 x 65 x 6 milimetre size and 3.65 metre long, inflated bottom and drilled on top and painting posts white & Block border of 25 centimeteres fitting board to post with 2 numbers and nuts including transportation & Fixing in P.C.C 1:4:8 etc. Complete.** | **NO.** | 6950 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात चेना गाव मुख्य रस्ता ते प्राथमिक शाळेपर्यंत स्ट्रीट लाईट पोल, केबल्स बदलणे | रु. ५,३८,९१३/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ७१ | चेना गाव अंतर्गत द्वारका हॉटेल ते पाण्याच्या टाकीपर्यंत स्ट्रीट लाईट पोल केबल्स बदलणे. | रु. ५,३९,९६७/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ७२ | चेनागाव अंतर्गत बेलकरी पाडा येथील स्ट्रीट लाईट पोल केबल्स बदलणे. | रु. ४,४२,५९३/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ७३ | चेनागाव अंतर्गत पाटील पाडा येथील स्ट्रीट लाईट पोल केबल्स बदलणे. | रु. ४,१८,८६१/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७४ | चेनागाव अंतर्गत प्राथमिक शाळा ते गांवदेवी मंदिर पर्यंत स्ट्रीट लाईट पोल केबल्स बदलणे. | रु. ५,३६,४७८/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ७५ | काजूपाडा गांव अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल केबल्स बदलणे. | रु. ४,९१,७५४/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ७६ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १८ मधील भारतनगर येथे व गंगा छाया इमारती समोर गटारावर स्लॅब टाकणे तसेच प्रभाग क्र. १९ मधील अंकुर इमारती जवळ गटारावर स्लॅब टाकून झाकणे बसविणे | रू. ४९,९९९/- | मे. श्रीगणेश इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ७७ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ४७ मधील हेमा कुंज इमारती जवळ क्रॉसिंगवर स्लॅब टाकणे. | रू. ४९,०००/- | मे. श्रीगणेश इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ७८ | मिरा ते चेना विभागात गप्पी मासे पैदास करणे कामी हौद बांधणे. | रू. ४९,७००/- | मे. राठोड ब्रदर्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ७९ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक शौचालये दुरूस्ती करणे. | रू. ५,००,०००/- | मे. श्रीगजानन मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ८० | मिरारोड वॉर्ड क्र. ६९ शांतिनगर से. ८ मधील बगीच्या मैदान व नाना नानी पार्कच्या कुंपणभिंतीवर ग्रिल्स बसविणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ४,९५,०००/- | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ८१ | मिरारोड वॉर्ड क्र. ५५ मधील गोयल प्लाझा ते धरती कॉम्पलेक्स गटारावर स्लॅब टाकणे. (प्रभाग समिती निधी) | रू. ४,९७,०००/- | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ८२ | मिरारोड वार्ड क्र. ६९ मधील सृष्टी से.३ येथे बस स्टॉप बनविणे. (नगरसेवक निधी) | रु. ३,२५,०००/- | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | कोटेशन दराने |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | **परिणाम** | **दर (सर्व करांसहित) रुपये प्रती बस थांबा करीता** |
|---|---|---|---|
| १. | मिरारोड वार्ड क्र. ६९ मधील सृष्टी से.३ येथे बस स्टॉप बनविणे. (नगरसेवक निधी) | १ | **३२४०००/-** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८३ | भाईंदर (प.) प्रभाग क्र.३७ येथे अमीधारा अपार्ट, राणीसनी धाम बिल्डींग व प्रतिज्ञा बिल्डींग समोर सी.सी. रस्ता तयार करुन पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी | रू. ९,९८,०००/- | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |

वरील पैकी, अ.क्र. १ ते ८३ या कामांकरीता मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार अवलोकन करून मान्यता देण्यात येत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, या शहरामध्ये १५-२० दिवस पाण्याची जाम बोंबाबोंब आहे. नक्की परिस्थिती काय आहे? सणासुदाच्या दिवशीमध्ये जिथे ३६ तास पाणी यायच तेथे ४८-५२ तास पाणी आणि नंतर प्रेशरच नाही. पाणी कपात होते त्यावेळेला बरोबर होते. आता सध्या पाणी किती येते.

**रमेश मटकर :-**

सध्या जे स्टेट प्राधिकरणाकडून पाणी मिळत आहे. ते सर्वसाधारणपणे १०५ एमएलडी सरासरी दर दिवशी मिळत आहे. पण ब-याच ठिकाणी बायपासने पाणी सोडल जात असल्यामुळे प्रेशर सिस्टममध्ये राहत नाही. बहुतांशी

वेस्ट भागात सुदामनगर टाकी त्यानंतर सर्वे ७७ मध्ये सुध्दा बायपास करून पाणी सोडल जात. बायपास सोडल्यामुळे मागच्या प्रेशरवर सुध्दा परिणाम होत आहे.

**अनिल सावंत :-**

बायपास आता सोडतात की अगोदर पासून सिस्टीम चालू आहे.

**याकुब कुरेशी :-**

नाही नाही सावंत साहेब बायपास जे तुम्ही सांगता हे वेस्टच आहे आणि ते मिरारोडच बोलताहेत. कन्फुज करू नका. माझ म्हणण असे आहे. वेस्ट का प्रॉब्लेम है ही। मैं मुझे जानकारी मालून है। इसलिए उनको समझा रहा हूँ। बायपास का जो पाणी छोडा जाता है वो वेस्ट का छोडा जाता है। इस्ट का नही था मिरारोड का नही इस्ट मे और मिरारोड में प्रॉब्लेम नही होना चाहिए।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

५ एमएलडी पाणी सॅक्शन झालेला आहे पण तो ही पाणी आम्हाला मिळत नाही.

**जुबेर इनामदार :-**

आज किती पाणी आहे.

**रमेश मटकर :-**

१०५ एम.एल.डी.

**जुबेर इनामदार :-**

१०५ एमएलडी पाणी २४ तासाला झाला की नाही पाणी साहेब १०५ एमएलडी पाणी येऊनही या शहरामध्ये पाणी आपण आज ४०-४५ तासाला सांगतो याचा अर्थ पाणी येतो साहेब. २४ तासाला १०५ एमएलडी पाणी म्हणजे त्या लाईनीमधून चांगल्या प्रेशरमध्ये पाणी येतो.

**रमेश मटकर :-**

पाणी येतो पण वेस्टच्या भागातून रेल्वेचा पाईप आहे. ६०० एम.एम. चा तो १००० एम.एम. चा करणे प्रस्तावित आहे. त्यामुळे जे बायपास सुरू होतात. त्यामुळे कम्प्लीट सिस्टीमला परिणाम होतो.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

तुमची माणस गडबडी करतात. ज्या सोसायटीचे पैसे त्यांना बांधलेले आहेत त्याठिकाणी पाणीपुरवठा व्यवस्थित होतो. पैसे जेथे मिळत नाहीत त्यांना पाणी व्यवस्थित सोडत नाही. जेथे सोसायटीला पाणी जास्त पाहिजे असेल तर तेथे वॉल ते जास्त प्रमाणात खोलतात. तेथे पाणी जास्त प्रमाणात मिळतो.

**जुबेर इनामदार :-**

साहेब काय कारण असू शकतात. तुम्हाला चांगला अनुभव आहे. काय प्रॉब्लेम आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

तुमच्याइकडे तुमची माणस पाणी विभागाची अनधिकृत पाण्याची कनेक्शन जोडतात. तुमची परवानगी घेतली का दाखवू का? किती कनेक्शन जोडली आहेत ती.

**रमेश मटकर :-**

जर दाखवली तर कारवाई होईलच.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

काय कारवाई करता? कोण कारवाई करत नाही.

**याकुब कुरेशी :-**

नाही नाही म्हात्रे साहेब मी काय बोलतो अस काय असेल तर कारवाई करू. सभेमध्ये तुम्ही दाखवाना कशी कारवाई होत नाही ते बघूना.

**मा. सभापती :-**

तुम्ही लेटर द्या.

**अनिल सावंत :-**

म्हात्रे साहेब बिल्डींगच नाव सांगा ना.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

इंदिरा हॉस्पीटलला एक लाईन दिली. एक लाईन सेक्टर नं. ६ ला गुप्ता हॉटेलला दिली.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती ही जी ऑर्डर दिली आहे ती कधी दिली आहे. कनेक्शन बंद कुठे आहेत?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

कनेक्शन तर चालू आहेत. पण त्या बिल्डींगला कनेक्शन दिलेल आहे. यात लिहिलेल आहे. आपणांस या आदेशान्वये कळविण्यात येते की विनोद चंद्रिका यादव या इमारती घरास-घरास देतो म्हणून सांगितले आहे. आणि ते हॉटेलला दिलेले आहे.

**अनिल सावंत :-**

कधीची आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

ज्यावेळेला पकडली त्यावेळेस दिल आणि त्यात काय लिहील आहे. घरास देतो अस लिहील आहे. आणि त्या हॉटेलला लाईन देतात त्याच्यामध्ये लिहिलय काय ते बघा. तुम्ही करा बघू आता तुम्ही कारवाई करा. माझ्याकडे त्याची झेरॉक्स द्या मला मी काय म्हणतो त्याला दिली. इंदिरा हॉस्पीटल कोणतरी पत्रकार आहे. त्या पत्रकारच्या प्रेशरमध्ये येऊन त्याना कनेक्शन दिलेल आहे. आणि सेक्टर ६ च आमच्या इकडच पाणी कापून घेतल. पत्रकाराचा प्रेशर आहे म्हणून दिले पत्रकार कोण? मग आमच्या का फायली पास करत नाही? आम्ही पण देतो ना आमच्या का करत नाही अजूनपर्यंत?

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, नगरसेवक आता है, उसका काम नही होता है। दलालोका काम होता है।

**रमेश मटकर :-**

मी आल्यापासून किती तरी नगरसेवक आले साहेब त्याच्या फाईली ताबडतोब साहेबाकडे पाठवल्या आहेत. फाईली पेन्डींग नाहीत.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आता तुम्ही साहेब याच्यावर काय कारवाई कराल. इंदिरा हॉस्पीटलला लाईन दिली आहे. त्यांच काय कराल सांगा.

**रमेश मटकर :-**

हे मी नोट करून घेता.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

इंदिरा हॉस्पीटलला लाईन दिली आहे. हॉस्पीटल आपल्याला मोफत एन्ट्री देईल का.

**अनिल सावंत :-**

टॅक्स डिपार्टमेंट इंदिरा हॉस्पीटलचा आता म्हात्रे साहेबांनी विषय काढला त्याला आपण टॅक्स कसे लावतो?

**विजय पाटील :-**

आपण त्याला टॅक्स रेसिडेन्सीप्रमाणे लावतो.

**अनिल सावंत :-**

म्हात्रे साहेब ते काय म्हणतात ते ऐका. कमर्शियल हॉस्पीटल आहे तुम्ही म्हणता त्यांनी बरोबर सांगितल रेसिडेन्शीयल लावतात टॅक्स

**चंद्रकांत म्हात्रे :-**

सेक्टर नंबर ६ वॉर्ड नंबर ६४ त्याच्यामध्ये तुमचा तो कॉन्ट्रॅक्टर दिलेला आहे. त्याचा ते लाईन साफ करायला कोण बी/६ आणि ए ७ चा किती दिवस झाल तो लाईन साफ करायला आले नाहीत सोसायटीवाले परेशान झाले आहेत. त्याच्यावरती अजून तोडगा निघालेला नाही. जमत नसेल तर सोसायटीच्या सदस्यांना घेऊन तुमच्याकडे घेऊन येणार केबिनमध्ये

**अनिल सावंत :-**

म्हात्रे साहेब तुम्ही आरएनए कोटियाडच सांगताना इंदिरा हॉस्पीटल नया बनाया है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

तुम्ही नविन आहात तुमची माणस जे करतात ते बघा.

**रमेश मटकर :-**

मी नोट करून घेतो.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

बी ६ आणि ए ७ आज किती दिवस ते म्हणतात. सोसायटीचा प्रॉब्लेम आहे. सोसायटी टॅक्स भरते तुम्ही ते शांती स्टार बिल्डरने गडबड केलेली आहे. ते आता त्यांच्या माथ्यावर फोडताय ते म्हणतात त्या दोघांची कनेक्शन एकात जोडलेले आहेत ते जोडल्यामुळे आम्ही काय करणार ते सोसायटीने करा. सोसायटी पण करायला तयार आहे पण तुम्ही काहीतरी त्यांना मार्ग दाखवा तो म्हणतो प्रायव्हेट करा.

**शिवाजी बारकुंड :-**

ती वस्तुस्थिती मला माहिती आहे. मी जरा क्लिअर करतो. बाहेरची रोडवरची जी सिवर लाईन जी आहे ती महापालिकेची आहे. त्या लाईनमध्ये अडचण नाही कंम्पाऊंडच्या आत मध्ये बिल्डींगची लाईन असते आपण बऱ्याच वेळा मी सुध्दा तुमच्याबरोबर आलो होतो. अंतर्गत एक माणुसकीच्या दृष्टीने आपण साफ करून दिली. परंतु दर वेळेला प्रत्येक सोसायटीच्या प्रिमायसेस मधून महापालिकेला साफ करण शक्य नाही. आपण एकदम प्रॉब्लेम झाल्यावर साफ करून दिलेलेच सोसायटीची पण जबाबदारी की सोसायटीच्या आतमध्ये चेंम्बर, पाईपलाईन त्यांनी निट ठेवायला पाहिजे. महापालिकेच्या रस्त्याच्या लाईनपर्यंत क्लिअर ठेवायची जबाबदारी त्यांची. आपण लोकांच्या समोर मेन रोडवरचा चेंम्बर खोलून दाखवू. महानगरपालिकेची लाईन क्लिअर असेल आणि सोसायटीची लाईन ब्लॉक असेल तर ती लाईन आरोग्याच्या दृष्टीने आपण दहा वेळा साफ केलेली आहे. परंतु प्रत्येक वेळेस महानगरपालिकेने आपण कराव अस अपेक्षित नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मी काय म्हणतो आता तुम्ही म्हणता त्याच्याशी मी सहमत आहे. मी नाही म्हणत नाही परिस्थिती अशी पण ते करायला तर पाहिजे ना. कुणीतरी सोसायटी खर्च करायला तयार आहे. पण तुम्ही तुमची माणसे हे कराना.

**शिवाजी बारकुंड :-**

देऊ ना? त्यांना कस करायच कोण करणार.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

उद्या जर तुमच्या लाईनला हात घातला दुस-या कुठल्या प्रायव्हेट कंपनीने येवून तर चालेल का?

**शिवाजी बारकुंड :-**

नाही, नाही त्याला आपण लेखी परवानगी आणि आमच्या इंजिनिअरच्या सुपरव्हिजन खाली करून घेऊ ना?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

तुम्ही एक काम करा तुमचे इंजिनियर सुपरवायझर आहेत ना. तुम्ही एक टाईम ठेवा. सोसायटीची मिटींग ठेवतो.

**शिवाजी बारकुंड :-**

सांगा तुम्ही आता सांगा. तुम्ही सांगा त्यावेळेस कधी आणि किती वाजता तिथे आमच्या डेप्युटी इंजिनियर असतील ज्युनियर इंजिनियर पण असतील

**चंद्रकांत म्हात्रे :-**

ठिक आज मी सोसायटीची मिटींग घेतो आणि त्यांना सांगतो. तुम्ही बसा आणि काय आहे ते करा. सोसायटी खर्च करेल.

**सुधा व्यास :-**

साहेब एक मेरी विनंती है की, जब गर्मी थी तब इतना पाणी का प्रॉब्लेम नही था। अभी क्या जनरल क्वेशन है की सभी पुछते है। की इतनी बारीश आयी है फिर पानी क्यु नही है।

**जुबेर इनामदार :-**

मटकर साहेब हा आता सरसकट विषय आहे. पाण्याची टंचाई पूर्ण शहरामध्ये आहे. बरोबर आहे. ५० तासाच्या खाली तुम्ही पाणी देत नाही. १०५ एमएलडी पाणी तुम्हाला २४ तासामध्ये येतो. म्हणजे याचा पाणी जिरतो कुठे.

**रमेश मटकर :-**

त्याचच कारण मी आता सांगितल की, काही ठिकाणी आपण बायपास करतोय काही ठिकाणी टाकीतून देतोय. जिथे टाकीतून देतो. अस्मिता पार्कमध्ये तिथेपण माझ्या काल चर्चा करताना लक्षात आल की पूर्ण वेळ टाकी भरत नाही. टाकी भरण्यासाठी तीन तास बंद केल जात. पूर्ण टाकी भरली जात नाही. म्हणजे आपण तो पण टाईम वेस्ट करतोय. म्हणजे एका ठिकाणी शहरात बायपास घडले की सगळीकडेच उघडायला लागतात. एका ठिकाणी बायपास अस होऊ शकत नाही. त्या सिस्टिमवर परिणाम होतो. त्यामुळे एकतर सगळे बायपास बंद किंवा सगळे बायपास सगळ्या ठिकाणी खालून पाणी दिल गेल पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

नाही पण आपण म्हणता प्रेशर नाही. पण १०५ एमएलडी पाणी येतो कसा. आपल्याकडे ८६ एमएलडी पाणी येत होता. साहेब तेव्हा एवढी वाईट परिस्थिती नव्हती आणि ह्या तुम्हाला मी दोन-चार महिन्यात मागच बोलत नाही. १५-२० दिवसामध्ये प्रमाण जास्त वाढले आहे.

**रमेश मटकर :-**

पाणी कॉन्टेडी आली तरी प्रेशर लागतो आपल्याला घरीपण. सर मला सांगा २४ तासामध्ये १०५ एमएलडी पाणी ८६ एमएलडी पाणी येत होत तेव्हा ते २४ तासामध्ये येत होत ना. पाणी आज १३५ एलपीसीडी रेट पाहिजे. आपल्याकडे तो ७०-७५ लिटर एलपीसीडी ने पाणी मिळतो. आपल्याकडे २०-२५ टक्के गळतीच घरल.

**जुबेर इनामदार :-**

मटकर साहेब या तांत्रिक बाबी आहेत तुमच्या.

**रमेश मटकर :-**

थोड मी आता गणपतीच्या ह्या चालू असलेल्या सिस्टममध्ये थोडा बदल केलेला आहे. गणपतीचा उत्सव चालू होता. ह्या चालू असलेल्या सिस्टममध्ये बदल केला नाही. आता प्रत्येक टाकीचा आढावा घेऊन, झोनचा आढावा घेऊन बदल करायचे आहेत.

**जुबेर इनामदार :-**

आमच्या पूर्ण सणासुदीच्या दिवसात आमच्या रमाजान ईदच्या दिवशी त्या दिवशी पाणी नव्हता. आमच्या समाजातील माणस म्हणतात अल्पसंख्याक समाजा बरोबर कुठेतरी अन्याय चालू आहे. असा आरोप करायला लागले तर काय उत्तर द्याल तुम्ही.

**रमेश मटकर :-**

म्हणूनच मी सांगतो मी कुठलेही बदल केलेले नाही. टाकीच्या झोनिंगमध्ये कुठलेही बदल केलेले नाहीत. १५ दिवसाठी आता १५ दिवसानंतर थोडा आढावा घेऊन बदल करण्यात येतील त्याचा परिणाम दिसेल.

**जुबेर इनामदार :-**

पाण्याच कनेक्शन आता बंदच करा. पाणी आहे त्यांना द्यायला नाही. मग कनेक्शन बंद करा. आपल्याकडे आहे त्या लोकांना द्यायला पाणी नाही तर नविन लोकांना देणार कुठून. गावामध्ये रोज नविन लोक येतात राहायला ते कधीच बंद होणार नाही. आपल्याकडे तेवढे पाणी आहे का द्यायला. पण हा विषय असा आहे मटकर साहेब. पाणी या शहराची गरज आहेच आहे त्याच्यामुळे बरच काही राजकारण आणि वाद झालेला आहे. या शहरामध्ये

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मोठे मोठे हॉटेल झाले आहेत. त्या हॉटेलमध्ये दहा-दहा कनेक्शन लागलेले आहेत.

**अनिल सावंत :-**

पाटील साहेब म्हात्रे साहेबांनी जो विषय काढला इंदिरा हॉस्पीटल आता जे.आर.एन.ए. कोटीयाडमध्ये चालू झालेले आहे. त्याचा टॅक्स कुठचा लावता तुम्ही. हॉस्पीटल हे कमर्शियल मध्ये येत की रेसिडेन्शीयल येते.

**विजय पाटील :-**

कर्मशियमध्ये येते.

**अनिल सावत :-**

पाटील साहेब बजेटचे सत्र चालू असताना इकडे बरीच चर्चा झाली. मिरा भायंदर आजच्या तारखेला ब-याच रेसिडेन्शीयल कर्मशियल ॲक्टीविटीज मध्ये त्यांनी भिंत तोडून शटर्स गायब केलेले आहेत. शो-रूम तयार केलेले आहेत. अजूनही त्यांना आपण रेसिडेन्शीयल टॅक्स लावतो.

**विजय पाटील :-**

नाही अस नाही.

**जुबेर इनामदार :-**

छाननी करा. शांतीनगर सेक्टर ३ मध्ये आजही तीच परिस्थिती आहे. अधिकृत आहे. अनधिकृत आहे ते नंतर कमीत-कमी आपल उत्पन्न तरी वाढवा.

**अनिल सावंत :-**

साहेब आरएनए कोरियाड इंदिरा हॉस्पीटल, शांतीनगर सेक्टर तीन बिल्डींग नंबर ए-७. धनेगावे साहेब, परिस्थिती काय आहे माहिती आहे. आपण एखाद्या बिल्डींगला परमिशन देतो. ग्राऊंन्ड फ्लोरला कमर्शियल असेल शॉपिंग असेल तर समजू शकतो आता लोकांना फर्स्ट फ्लोरला अल्टरनेशन केले आहे. आत मधून शॉपिंग मधून सिडी काढलेले आहे. मग त्याच्यावर आपला काय कंट्रोल आहे कारवाई कोण करणार त्यांच्यावर अन्टरनेशनची परवानगी आपण देऊ शकतो का?

**सत्यवान धनेगावे :-**

सभापती साहेबच्या परवानगीने बोलतो, महापालिकेकडून परवानगी दिलेली नाही.

**अनिल सावंत :-**

तरीसुध्दा त्यांनी केलेल आहे त्याच्यावर कारवाई कोण करणार.

**सत्यवान धनेगावे :-**

अनाधिकृत बांधकाम.

**अनिल सावंत :-**

अनाधिकृत बांधकाम ते सध्या डिपार्टमेन्टच नाही. आपल्या पालिकेमध्ये अनधिकृत बांधकाम डिपार्टमेन्ट कुठे आहे. प्रभात अधिका-यांना विचारल तर ते सांगतील चौकशी करून सांगतो. दिवसातून चार वेळा तरी जात असतील त्या रोडवरून.

**सत्यवान धनेगावे :-**

एकत्र सर्वे करून एकत्र कारवाई करू.

**अनिल सावंत :-**

हा जरा करून घ्या आणि पुढच्या स्टॅण्डींग मध्ये रिपोर्ट द्या तो.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब अगली मिटींग मे मैने ये विषय पे बताया था। की जो पहले माले पे टोटल मिरा भाईंदर की बात करता है। शांती नगर में वो महानगरपालिका के माध्यमोसे जो नगररचना परमिशन दिया जाएगा तो डेव्हलोपमेन्ट चार्ज ले सकते है। वो विषय मैने रखा था। बजेट के मिटींगमें भी बताया था। तो ये होएगा तो अच्छा है। वैसे भी वो लोग मतलब पहले माले पे तोडेगा तो पूरा बिल्डींग गिरेगा निचे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

नही गिरेगा नही. जुन्या बिल्डींग झालेल्या आहेत. आणि त्यांनी काय केलेल आहे. सर्रासपणे आता काय झालेल आहे इमारती आहेत त्या तिकडे संपूर्ण फस्ट फ्लोरच विक्री करून खालन जिना तयार करून वरती शोरूम बनवतात. तुम्ही परमिशन देता का त्याला.

**चंद्रकांत मोदी :-**

देते नही पर देना चाहिए.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

देना नही चाहिए रसिडेन्ट पे तुम देगा बोलेगा तो कैसा है।

**सत्यवान धनेगावे :-**

अशा परवानग्या दिलेल्या नाहीत त्या लोकांना अनधिकृतपणे केलेल्या आहेत.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आज राहण्यासाठी घेतल उद्या तेथे हॉटेल चालू केल तर चालेल.

**सत्यवान धनेगावे :-**

रेसिडेन्शीयल फ्लॅट घून ते कमर्शियल हे अनऑथराईज्ड आहे. परवानगी नाही

**चंद्रकांत म्हात्रे :-**

परवानगी नाही ना. ठिक आहे.

(सभागृहात गोंधळ)

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त)**

परमिशन मिळत नाही. एकदा प्लाान मंजुर झाला ना. टॅक्स वसुल करता येतो असा रूलच नसतो.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

टॅक्स भरायला लोक तयार आहेत त्याचा प्रश्न नाही हो पण तिथल्या रेसिडेन्शीयल लोकांचा प्रश्न आहे.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब हा जो विषय आहे. मुंबई महानगरपालिकेने इप्लीमेंन्ट करायला सुरूवात केली आहे. त्याच्यामध्ये अस आहे की मोठमोठी हॉटेल्स वैगेरे आहे. किंवा मोठे संकुल आहेत. त्यांना बसवायला सांगितलेल्या काही ठिकाणी नगरसेवकांनी आपल्या नगरसेवक निधी मधून सुध्दा ह्या मशिन्स दिलेल्या आहेत. जिथे मोठी संकुल आहेत अशी १५-१६ इमारती असतील तिथे जर अडीच तीन लाखापर्यंत मशिन देऊन तो जर त्यांचा कचऱ्याचा प्रश्न सॉल होत असेल आणि गार्डनला फर्टिलायझर मिळत असेल तर तो फार मोठी फायदा महापालिकेला होईल कारण दिवसेंदिवस कचऱ्याची समस्या फार बिकट होत जाणार आहे. माझी आपल्याला विनंती आहे की या महापालिकेमध्ये ज्या नगरसेवकांना इच्छा असेल की त्यांच्या नगरसेवक निधीमधून किंवा प्रभाग निधीमधून जर ते मशीन त्या सोसायटीला देत असतील तुम्ही ज्या मशिन लावल्या आहेत त्याची माहिती मागवा त्याला डेमोस्टेशनला बोलवा. पालिकेमार्फत आणि ह्या ज्या मशिन इस्टोल होत असतील तर त्या शहरामध्ये करायला काहीच हरकत नाही. आणि दुसरी गोष्ट अशी आहे की नवीन संकुलाना आपण परवानगी देतो त्यांना हे कम्पलसरी करा. मेन्टेनेस आजकाल ही मशीन डेमोस्ट्रेशन करा मुंबई महापालिकेला पत्र लिहा. नगरसेवक निधी एखादा जरी बसवला असेल तरी आपल्याला द्यायला हरकत नाही. नाही बघून घ्या. लोकसत्तेमध्ये १६ जूनच्या लोकसत्ता पेपरमध्ये आल होत मशिनच्या बाबतीत आल होत माहिती मागवून घ्या त्या लोकांचा इ-मेल या ठिकाणी दिलेला आहे त्याला बोलवून घ्या. प्रसाद रावकर आहेत.

**मा. आयुक्त :-**

साहेब मी आता याठिकाणी जो आता ठेकेदार आहे त्याला बोलवून घ्या. मुंबई महापालिकेला पत्र लिहा. अगोदर डिमोस्ट्रेशन आणि स्टॅण्डींग कमिटीच्या केबीनमध्ये लावू. पुढच्या स्टॅण्डींगला आणि वर्किंग कंन्डीशनमध्ये आहे ते बघायला पाठवून देऊ.

**अनिल सावंत :-**

आम्हाला कुठे नेत नाही हे. ते बस बघायला नेत होते ते किती झाले चार महिने झाले. फक्त तुम्ही सांगता नेतो म्हणून.

**याकुब कुरेशी :-**

पाण्याच्या विषयावरती पेन्डींग ठेवलेल साहेबासाठी साहेब नव्हते म्हणून.

**अनिल सावंत :-**

या विषयावर ठराव करून घेतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

साहेब बोलले आपली एकी नाही बरोबर आहे. मिरा भायंदर शहरामध्ये आमच्या एकीसारखे ठराव करा ना साहेब याचा ठराव करून घेऊ या.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध विकास कामे करताना राज्य शासनाकडील सार्वजनिक बांधकाम विभाग सीएटी ०७/०६/प्र.क्र.९४/इमा.२, दि. १६/११/२००६ रोजीचा शासन निर्णय आहे. सदर शासन निर्णयानुसार निविद न मागविता मजूर सहकारी संस्थांना व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना कामे देता येतात. सदर निर्णयानुसार प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात येते. तरी सदर शासन निर्णयानुसार निविदा न मागविता कामे करुन घेण्यास व पुढे करावयांच्या कामांबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची ''ड'' मधील प्रकरण पाच (२) (२) अन्वये कार्यवाही करण्यास ही सभा मा. आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

**चंद्रकांम मोदी :-**

मेरा अनुमोदन है।

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. :-**

मा. आयुक्त यांना प्राधिकृत करणेबाबत.

**ठराव क्र. ६३अ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध विकास कामे करताना राज्य शासनाकडील सार्वजनिक बांधकाम विभाग सीएटी ०७/०६/प्र.क्र.९४/इमा.२, दि. १६/११/२००६ रोजीचा शासन निर्णय आहे. सदर शासन निर्णयानुसार निविद न मागविता मजूर सहकारी संस्थांना व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना कामे देता येतात. सदर निर्णयानुसार प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात येते. तरी सदर शासन निर्णयानुसार निविदा न मागविता कामे करुन घेण्यास व पुढे करावयांच्या कामांबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची ''ड'' मधील प्रकरण पाच (२) (२) अन्वये कार्यवाही करण्यास ही सभा मा. आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत म्हात्रे** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७०, शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंबंधी विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**मा. आयुक्त :-**

पहिल्यांदा सांगितले हा ठराव मांडला आहे. पहिल्यांदा सांगितल आहे त्यांना बोलावून डिमोस्ट्रेशन करून घ्या.

**अनिल सावंत :-**

ठराव आम्ही केला आहे. प्रेसिसिंग तुम्ही चालू करा ना.

**मा. आयुक्त :-**

पसंद करण्यापूर्वी तुम्ही घ्याच म्हटल आहे ते. त्यात म्हटल आहे ना डिमोस्ट्रेशन करा. जे योग्य आहे ते करा.

**मा. सभापती :-**

प्रकरण ७० कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंबंधी विषय सर्वानुमते मंजूर

**प्रकरण क्र. ७० :-**

शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंबंधी विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी एकमेव असलेला उत्तन येथील घनकचरा प्रकल्प वादाच्या भोवऱ्यात सापडलेला आहे. महानगरपालिका यासाठी दुसरी जागा शोधण्याच्या प्रयत्नात आहेत. या अनुषंगाने मुंबई महानगरपालिकेने, एका कंपनीने ओल्या सेंद्रीय कचऱ्यापासून खतनिर्मिती तयार करणारी विकसीत केलेली मशीन काही बड्या कंपन्या व संकुले यांना बसविण्यासाठी प्रवृत्त केले आहे व त्याठिकाणी प्रतीदिन २० ते २०० किलो कचऱ्याची विल्हेवाट लागून खतनिर्मिती होत आहे. सदर मशीन पालिका क्षेत्रामध्ये बसविण्यासाठी छोट्या मोठ्या सोसायट्यांना प्रवृत्त कचऱ्याचे विल्हेवाट जागेवरच लावणे शक्य होईल. तसेच नगरसेवक निधीतून प्रत्येक प्रभागात हे मशीन बसविण्यात आले तरी कचऱ्याचे विल्हेवाट लावणे सोईस्कर ठरेल.

नवीन संकुलांना परवानगी देतेवेळी ही मशीन लावणे बंधनकारक केल्यास बऱ्याच प्रमाणात कचऱ्याची समस्या सुटेल. शहरामध्ये विविध ठिकाणी बगीचे विकसीत होत आहेत. त्याठिकाणी मशीन बसविल्यास बगीचांना लागणारा खतचा प्रश्न सुटेल व महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल. तरी नगरसेवक व प्रभाग निधीमधून व जनरल निधीमधून अशा मशिन्स खरेदी करण्यास परवानगी देण्यात यावी. तसेच शहरातील सध्या अस्तित्वात असलेल्या मांठ्या संकुलांना व नवीन संकुलांना परवानगी देते वेळी सदर मशिन बसविणे अनिवार्य करावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. याकुब कुरेशी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**याकुब कुरेशी :-**

साहेब थोड पाण्याच्या विषयावर तुम्ही नव्हते म्हणून बोलायच राहील आहे. आता भायंदर वेस्टला बायपासने पाणी जात सुभाषचंद्र बोस स्टेडियममध्ये जी आपली पाण्याची अंडरग्राऊन्ड टाकी आहे ती तर त्याची काय मला वाटते सॉल्ट डिपार्टमेन्टवाले अडथळा आणतात तर माझ्या माहितीप्रमाणे त्यांच्याशी चर्चा झाली आहे त्या चर्चेमध्ये त्यांच कामही चालू झालेल आहे. मग परत ते काम बंद झाल. तुम्हाला सांगतो तुम्हाला कदाचित आठवत असेल. तुम्ही आल्याबरोबर सात ते आठ महिन्यावर तुम्हाला एक सुचना दिलेली हे जे काम पास झालेल होत तो १० ते ११ वर्षापूर्वीच पास आहे. त्याच्यामध्ये जे टेंडर पास झालेल त्या कॉन्ट्रॅक्टरना काम बंद पडल्यामुळे आता परवडत नाही. म्हणून ते सात महिन्या अगोदरच सांगितलेल होत की, त्याच्यामध्ये जे वाढीव खर्च द्यायचा असेल किंवा द्यायलाच लागणार आहे. आणि ती लोक करणार नाही. एमजीपी वाले माझ्या माहितीप्रमाणे तर आपण त्यामध्ये थोडीशी काही वाढ करून त्यांच्याबरोबर बसून त्या विषयावर विल्हेवाट लावावी अशी मी तुम्हाला विनंती करतो. आणि दुसरी एक आपल्याकडे वेस्टला दोन टाक्या आहेत. ज्या पंम्पिंगच्यामुळे बायपासने पाणी जाते. आणि त्यामुळे पाणी मिळतनाही. लोकांना तसच आता मला वाटत माझ्या माहितीप्रमाणे रेल्वेने आपल्याला गटाराच पाणी काढण्यासाठी परवानगी दिली तर त्याच्या मधले चार आपण पाणी काढण्यासाठी आणिदोन पाईपलाईनसाठी ठेवले, तर अति उत्तम राहील. आणि लवकरात लवकर ते काम आपल्याला हजार मिटरची जी पाईपलाईन टाकायची आहे ती टाकता येईल त्यामुळे बरीच अडचण भायंदर वेस्टची कमी होईल.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, मा. ढोबळे साहेबाकडे मिटींग झाली होती. त्या मिटींगमध्ये अस ठरल होत की अपूर्ण राहिलेली काम पूर्ण करण्यासाठी. त्यांनी काय केलय संप बांधण्यापूर्वी मशिनरी खरेदी केली आहे ती मशिनरी वाया गेली. ती अमच्या खर्ची घालतात ती रक्कम आम्ही खर्ची घालू देत नाही त्यांना नंतर ती रक्कम आम्हाला कमी पडते आणिसंप बांधू शकत नाही. म्हटल्यावर माझ्या माहितीप्रमाणे साडेतीन करोड रुपये भरून दोन वर्ष झाली. ३.२० झाली. ३.२० भरून देखील ते काम करायला तयार नाहीत आम्ही परवा चर्चा करताना अस सांगितल की ३.२० रक्कम आणि मशिनरीची जी अगोदर खरेदी केली आहे ती रक्कम मागणी चालू ठेवा आणि इकडे संप महापालिकेकडे मार्फत बांधायला सुरू करा अस सांगितले.

**याकुब कुरेशी :-**

माझ एवढच म्हणण आहे. आपल्याला जे प्रॉब्लेम आहेत ते इन्टरनल प्रॉब्लेम आहेत एमजीपीच्या बरोबर ते काय लोकांना आपण सांगू शकत नाही. त्यामुळे जे काही आहे जे आपल्याला ज्यांच्याकडून घेण आहे ते आपण देत राहू. पण जी लोकांची समस्या आहे ती दूर करण्यासाठी लवकरात लवकर काम करून घ्या अशी मी तुम्हाला विनंती करतो.

**जुबेर इनामदार :-**

सभापती साहेब आपल्या मान्यतेने माझ एक क चा प्रस्ताव आहे. आयुक्त साहेब लक्ष वेधू इच्छितो मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात चार प्रभाग समिती अस्तित्वात असून प्रत्येक प्रभागामध्ये माननीय महासभेच्या मान्यतेप्रमाणे फेरीवाला क्षेत्र व ना फेरीवाला क्षेत्र उचित करण्यात आलेल आहे. ना फेरीवाला क्षेत्रात अनधिकृतपणे व्यवसाय करणा-या फेरीवाल्यामुळे रस्त्यावर गाड्याची कोंडी व रहदारीला अडथळा निर्माण होत असतो. ना फेरिवाल्या क्षेत्रामध्ये फेरिवाल्याच कारवाई करणे व नियंत्रण ठेवणे हे प्रभाग अधिकारी व नेमलेल अतिक्रमण पथकाचे कर्मचारी यांचे काम आहे तरीही सदर बाबीची तक्रार संबंधी अधिका-यांना करूनही समाधानकारक कारवाई केल्याचे दिसून येत नाही. काही प्रभागामध्ये सोमवार व शनिवार बाजार भरवले जाता, असे बाजार फेरिवाला क्षेत्रामध्ये भरवायची परवानगी महानगरपालिकाने दिलेली नाही. शहरामध्ये दैनंदिन फेरीवाल्याची संख्या वाढत आहे. याच सदर विषयाबाबत शहराच्या हितामध्ये गांभिर्याने विचारकरणे गरजेचे आहे. तथापि या विषयावर दिनांक २१-९-२०१० रोजी ज्या स्थायी समितीमध्ये चर्चा करून निर्णय घेण्यास संमती मिळावी. साहेब सातत्याने नगरसेवक आम्ही आमच्या प्रभाग समित्या चार असल्या तरी मी माझ्या प्रभागापर्यंत मर्यादित बोलतो सातत्याने या विषयावर तक्रार करत असतो ना फेरिवाला क्षेत्रामधून फेरिवाले हटवा. ओळींचे उत्तर येते परत. पोलिस स्टेशनमध्ये मागणी केलेली आहे. बंदोबस्त मिळालेला नाही. कारवाई झाल्यानंतर फेरिवाले दिसले नाय पाहिजे. कारवाई होण्याच कारण प्रथमदर्शनी कारवाई झाली की फेरिवाले नसले पाहिजे. साहेब हात गाडीवाले, बसणारे, चायनिजच्या गाड्या त्याला काय मर्यादाच राहिली नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

सब जगह वॉर्ड मै है। साहेब ना फेरीवाला झोनमध्ये.

**जुबेर इनामदार :-**

के अन्वये प्रस्ताव - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ०४ प्रभाग समिती अस्तित्वात आहेत. प्रत्येक प्रभागामध्ये मा. महासभा दि. १९/०७/२००८, ठराव क्र. ३८ बहुसंखेने पारित करण्यात आलेल्या ठरावाप्रमाणे फेरीवाला क्षेत्र व ना फेरीवाला क्षेत्र हे निश्चित केले. बाजार लिलाव अटीशर्तीना अधिन राहून फेरीवाला क्षेत्रामधुनच फेरीवाल्यांकडून ठेकेदरांनी बाजार फी वसुल करावी असा नियम आहे व त्या अनुषंगाने सदर ठेका देण्यात आला. ना फेरीवला क्षेत्रामध्ये अनधिकृत व्यवसाय करणारे फेरीवाल्यांमुळे रस्त्यावर गाड्यांची कोडी व रहदारीला अडथळा निर्माण होतो. ना फेरीवाला क्षेत्रामधील फेरीवाल्यांवर कारवाई करणे, नियंत्रण ठेवणे व बाजार फी वसुली करणा-या ठेकेदारांना अशा अनधिकृत फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुली करणेबाबत रोकणे हे प्रभाग अधिकारी व नेमलेल्या

अतिक्रमण पथकांचे कर्तव्य आहे. तरी सदर बाबी तक्रार संबंधीत अधिका-याकडे करुनही समाधानकारक कारवाई केल्याची दिसून येत नाही. काही प्रभागामध्ये अनधिकृतपणे आठवडा बाजार, सोमवार व शनिवार बाजार भरविला जात आहे अशा बाजारांना फेरीवाला क्षेत्रामध्येही भरावयाची परवानगी महापालिकेने दिलेली नाही. याचा स्पष्ट उल्लेख अटीशर्तींमध्ये केलेला आहे. तरीही ठेकेदार अशा फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुल करतात. या कृतीची माहिती अधिका-यांना असूनही त्यांच्यावर जाणूनबजून कुठलीही कारवाई केली जात नाही.

सदर विषयाबाबत स्थानिक नगरसेवकांच्या तक्रारीला व बाजार अटीशर्तींना अधिन राहून जे प्रभाग अधिकारी व फेरीवाला अतिक्रमण पथकाचे कर्मचारी योग्य नियमाप्रमाणे कारवाई करत नसतील व कर्तव्यामध्ये निष्काळजीपणा दाखवित असतील अशा असक्षम अधिका-यांवर, कर्मचा-यांवर आयुक्तांची खात्री झाल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये कारवाई करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**तसेच पुढच्या मा. स्थायी समिती सभेमध्ये केलेल्या कारवाईचा आढावा सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.**

**अनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

आमच्याकडे अशीच परिस्थिती आहे. पहिले बसायचे आताही बसतात. नवघर रोड, बीपी रोड सगळ.

**जुबेर इनामदार :-**

साहेब दुसर म्हणजे आपण आपल्या अटीशर्ती जेव्हा ठेकेदाराला आपण ठेका दिला तेव्हा अशीशर्तीमध्ये शक्तीमध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे. ना फेरिवाला क्षेत्रामधून बसणा-या फेरिवाल्याकडून पैसे वसुली करु शकत नाही. बाजार फी घेतली जाऊ शकत नाही. तरी तेथे तो वसुल करतात हे त्या प्रभाग अधिका-याला माहीत नाही का. सोमवार बाजार, शनिवार बाजार ही प्रथा आपल्या गावामध्ये नव्हतीच आठवड्याचा बाजार ही प्रथा आपल्याला नकोच आहे. हा काय गाव नाही. आता शहर भरल पूर्ण लोकांसाठी रोज लागणारी वस्तू त्यांना रोजच मिळते. पूर्वी गावामध्ये असायच सोमवार बाजार, शनिवार बाजार आठवड्यामध्ये एकदा बाजार भरायचे लोक आपल्या गरजेच्या वस्तू त्या बाजारातून विकत घेत होते. आता आपल्याला त्याची गरज नाही. आणि अटीशर्तीमध्ये याचा स्पष्ट उल्लेख आहे. सोमवार बाजार किंवा शनिवार बाजार हा भरवला जाणार नाही. साहेब हा महापालिकेचा धोरणात्मक विषय झालेला आहे. याची अंमलबजावणी व्हायला पाहिजे. आपण साहेब तुमच्याकडून अपेक्षा साहेब १० जून २०१० मुख्य न्यायालय आणि जे.एन. पटेल व एस.सी. धर्माधिका-याच खंडापिठाने साहेब हे तुम्हाला हायकोर्टच्या डायरेक्शन आले होते. तुम्ही साहेब एका दिवसामध्ये तुमच्या अधिका-याचा वापर केला हायकोर्टाचे डायरेक्शन होते तुम्हाला कर्तव्य होते काम करणे ८०-८० हजाराचे बोट काढले आपण जेसीबी ने फोडून तेव्हा त्या डायरेक्शनमध्ये Remove ancroachment and unauthorized cost. from public land which includes roads pathways also मग साहेब रस्ते आणि पाथवे आहेत ना साहेब तेथे त्याच्यावरती फेरीवाले बसतात मग त्यांना हायकोर्टाचे डायरेक्शन लागले नाहीत का तुम्हाला. मिरारोड स्टेशन सुप्रिम कोर्टचे आदेश आहेत त्याची माहितीचा मी प्रयत्न करत होतो. अधिका-यांकडून माझ्याकडे त्याची पेपर कटिंग होती ती मला सापडली नाही. सुप्रिम कोर्टचे आदेश आहेत की १५०-२०० मिटर पर्यंत स्टेशनपर्यंत कुठेही फेरीवाला बसवता कामा नये हे आदेश सर्वोच्च न्यायालयाचे आहेत.

**अनिल सावंत :-**

५०० मिटर

**जुबेर इनामदार :-**

त्या आदेशाच पालन करत नाही. सुप्रिम कोर्टाचे आदेश असून त्याला आपली केराचर टोपली दाखवायची आपली तयारी आहे. इट इझ ए कन्टेन्ड ऑफ कोर्ट. अधिका-याकडून साहेब प्रभाग अधिका-याना उद्या त्यांना सांगितल हे ह्यांनी कराव किंवा दुस-या प्रभाग अधिका-यांनी कराव साहेब आम्हाला त्यांच्याकडून अपेक्षाच नाही. आम्हाला तुमच्याकडून अपेक्षा आहे. या वस्तूची या शहराला खरोखर साहेब या फेरिवाल्यांचा विघ्न आहे. हा त्रास आहे हा साहेब काढा. एवढ्या फेरिवाल्यांची आम्हाला गरज नाही. बाहेरचे मिरारोडमध्ये त्यांच काय लेणधेण नाही बाहेरचे येणारे फेरीवाले इथे येतात, कचरा करतात ते कचरा उचलायची जबाबदारी आमची रस्त्यावर खड्डे बुजवायची जबाबदारी आमची आणि काय देतात ते आपल्याला. ठेकेदाराना त्यांची ती फी ठेका देताना सगळ निश्चित करून झालेल आहे. ह्या क्षेत्रामधूनच तुम्हाला पैसे घ्यायचे आहेत. त्या अनुषंगाने त्यांनी ठेका भरला. साहेब आपल्यासमोर वारंवार घेऊन तो या विषयावर साहेब आम्हाला तुमच्याकडून अपेक्षा आहे. त्याच्या आधी तुम्ही या शहरामध्ये होतात तेव्हा तुम्ही बरच काही केल. शिवमुर्ती नाईकांनी या शहराकरता त्यांना सिंहाचा वाटा आहे. आता साहेब तुम्हाला ते कुठेतरी काय ते शेपूट पायाखाली आली.

**मा. आयुक्त :-**

गैरसमज आहे तो.

**जुबेर इनामदार :-**

गैरसमज करायची गरजच काय आहे. वस्तूस्थिती आहे ती.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

यापूर्वी प्रभाग अधिका-याला ६०-७० माणस होती. आपण काय साहेब महापालिकेच धोरण आहे. माणस कमी करणार मग बरीच माणस कमी केली होती. आता आमच धोरण आहे. यापेक्षा होमगार्डस नेमून होमगार्डना ड्रेस राहील. ड्रेस राहील्यानंतर चांगल्या प्रकारचे वाहन देणार. चारी प्रभागाच्या बैठक आता आम्ही घेऊ. त्याला आवश्यक ते मनुष्य बळ देणार त्याच्यापेक्षा होमगार्डस देऊन चांगल्या प्रकारची कारवाई आम्ही करू.

**जुबेर इनामदार :-**

होमगार्डस आपण घेतले. आता ते नको आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

नाही नाही साहेब आता कस आहे. प्रभाग अधिका-याला विचारा माणसच नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त साहेब शिंदे साहेबानी आपल्याकडे जे सफाई कामगार म्हणून ज्यांना भर्ती केल होत त्यांना रस्त्यावर गवत कापायला उभ केल होत.

**मा. सभापती :-**

साहेब याबाबतीत तुम्हीच उत्तर द्या सर तुम्ही काय कारवाई करता.

**जुबेर इनामदार :-**

प्रत्येक ऑफिसच्या बाहेर चार चार, पाच-पाच माणस मिळतील. फक्त टेबलावर रांगा लावून बसलेली असतात. त्यांना लावा ना धंद्याला कामाला.

**अनिल सावंत :-**

पानपट्टे साहेब माणस कधी कमी केली? कुठे कमी केली? पानपट्टे साहेब तुम्हाला अस सांगायच आहे का ६५ माणस जी होती प्रभाग समितीमध्ये ती आपण ठेक्यावर घेतली होती. कधी ठेका दिला होता तो सांगा जरा

**मा. आयुक्त :-**

तुमच ते स्कॉड आहे ना गाडी दिली माणस दिली त्याच काय. चायनीज तोडायला. ती किती आहेत. ती यांच्याशी संबंधित नाहीत ती माणस सेप्रेट माणस होती ती ट्रक आणि ती माणस माझ्यापुढे उभी केली ती. होमगार्डची परिस्थिती फार बेकार आहे कारण ती ट्राफीकला दिल होत.

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

मिनिमम एज चा प्रॉब्लेम येणार होता.

**मा. आयुक्त :-**

एजचा कायसंबंध येणार नाही मी सांगतो.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब आपका एक मिनिट लेता हूँ। होमगार्ड की जो बात निकली है ना परसो मेरे ऑफिस मे १५ होमगार्ड आये थे। वो बोला होमगार्ड हमको भर्ती करके दिनका हमको २०० रूपया मिलता है। गणपती मे किंधर भी भेजा, दुसरी जगह भेजा, तलाव पे भेजा तो २०० रूपया डेली का हमारा लिडर आता है। पगार के दिन बोल २५ रूपया डेली का २५ रूपया एक होमगार्ड का हमारे से लेके जाता है। मतलब वो सब भ्रष्टाचारी लोग है। होमगार्ड की कोई जरूरत नही है।

**मा. सभापती :-**

होमगार्डची आवश्यकता नाही. साहेब एक काम करा प्रत्येक पोलिस स्टेशनला त्या त्या प्रभाग समितीमध्ये पोलिस स्टेशन आहे. त्यांना साहेब आपल्या महानगरपालिकेच तुमच्या सहीच लेटर जाते ना हे फेरिवाले जे बसले आहेत. त्यांच्यावर कारवाई करा आणि केसेस करा हे उत्तम राहील.

**अनिल सावंत :-**

पोलिसवाले हप्ते घेतात. फेरिवाल्यांना उचलून घेऊन जातात आणि हप्ते घेतात १०००-१५०० रूपये घेऊन सोडतात.

**मा. सभापती :-**

हे आमच्याकडे नाही तस हप्प्त्याच वैगेरे पोलिस स्टेशनला

**मा. आयुक्त :-**

तो त्रास त्यांना व्हायला नको. नो फेरिवाला क्षेत्रात बसलेत ते.

**अनिल सावंत :-**

जे फेरिवाला पण उचलतात नो फेरिवाला झोन पण उचलतात. नो फेरिवाला झोन पूर्ण क्लिअर करा.

**मा. आयुक्त :-**

आम्ही जर पत्रानी कळवल की ना फेरिवाला क्षेत्रातलेच उठवा. कारण तो रस्ता नाक्यावर आहे. मग ते काय करतात ते बघायची गरज नाही.

**अनिल सावंत :-**

हरकत नाही.

**मा. आयुक्त :-**

माननीय सभापती साहेब फेरिवाल्याची संबंधी ही मिरा भाईंदरची शांकांतीका आहे असे नाही ही सगळीकडचीच आहे. यापूर्वी पानपट्टे साहेबांनी प्रभाग अधिकाऱ्याना सांगितल होत की, इथ एक ७-८ दहा लोक आहेत. की जे हातगाड्या भाड्याने देतात अणि ते काय हात गाड्या दिवसा तोडायची किंवा दिवसा बंद करायची गरज नाही. आपण एका आठवड्याला रात्री फेरी मारली तर ज्या ठिकाणी हात गाड्या आहेत त्यावेळी बंदोबस्त पण लागणार नाही. आणि हातगाड्या भाड्याने देणाऱ्याच्या दारात हातगाड्या उभ्या असतात ते १०० वेळा तरी मी सांगून झाल की, ज्या ठिकाणी आपण डास उत्पत्ती डास झाल्यानंतर मारायचं औषध मारतो त्यापेक्षा डासाची उत्पत्ती थांबवा म्हणून आपण अळीनाशक औषध टाकतो याच मुळ कारण एवढच आहे की बाहेरून आलेली जी लोक आहेत ती आपल्या स्थानिक लोकांकडून माल पण घेतात आणि हातगाडीपण घेतात. हातगाडी जो ठेकेदार आहे ७-८ जे १५ लोक आहेत ते स्वतःच्या दारात किंवा फ्लाट मध्ये डंम्प केलेल असतात तो माल ही परत देतात आणि पैसेही परत देतात आणि नंतर तो भाडं घेऊन माणूस निघून जाते. एक दोन रात्र पाळी जस केली तर हातगाड्या सगळ्या संपतील आणि पोलिस बंदोबस्तसुध्दा तुम्हाला लागणार नाही त्यामुळे हातगाड्या कोणकोणाच्या रस्त्यावर उभ्या आहेत किंवा कोणाकोणाच्या दारात डंम्प करून उभ्या आहेत. ते सगळ तोडून टाकान.

**चंद्रकांत मोदी :-**

पहले भी आदेश दिया था।

**मा. आयुक्त :-**

यापूर्वी पण सांगितलेल होत.

**जुबेर इनामदार :-**

सर आदेश तुम्ही देता त्याची अंमलबजावणी होत नाही.

**मा. आयुक्त :-**

नाही पण यापुढे जर सगळ्या प्रभाग अधिकाऱ्यानी ही जर कृती केली नाही तर यात दोन-तीन प्रकरण आहेत. हातगाडी, फेरीवाले आणि ना फेरिवाला क्षेत्रातल बंद जर केल नाही अणि अनऑथराईज्ड अतिक्रमण जर थांबवल नाही तर त्या त्या प्रभाग अधिकाऱ्याला आणि जेईला निलंबीत केल जाईल अशी सर्वांनी नोंद घ्या.

**जुबेर इनामदार ;-**

साहेब त्या अनुषंगाने तुम्हाला अजून ताकद देतो आम्ही

**मा. आयुक्त :-**

आणि अजून एक महत्वाची बाब म्हणजे त्यामध्ये दोन्ही गोष्टी समावेश केलेला जस हायकोर्टाने आणि सुप्रिम कोर्टाने सांगितल तस सुप्रिम कोर्टाने सुध्दा आदेश दिला. फेरिवाल्यांना तुम्ही त्याच उपजिविका काढून घेऊ नका म्हणून त्याची व्यवस्था करा.

**जुबेर इनामदार :-**

केली ना व्यवस्था फेरीवाला क्षेत्र ठेवल ना त्यांनी

**मा. आयुक्त :-**

नाही नाही जस त्यांनी सांगितल आहे तस सुप्रिम कोर्टाने देखिल सांगितल आहे त्यांच धोरण निश्चित करा.

**अनिल सावंत :-**

मार्केट बनवा ना.

**मा. आयुक्त :-**

धोरण ठरवा. मार्केट बनवायला तुमच्याकडे विषयच दिलेला आहे मी.

**अनिल सावंत :-**

केला ना पास आम्ही

**मा. आयुक्त :-**

नाही अजून पास नाही केला. यापुढे ना फेरिवाला क्षेत्रामध्ये बसू दिल जाणार नाही. हातगाड्या आणि चायनीस हे संपवा आठ दिवसाच्या आत.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब ते मीरारोडमध्ये आर.जी.पी फ्लॉट वर अनधिकृतपणे रेतीचा धंदा होतो आहे. त्याने बऱ्याचशा मॅन्ग्रोजच्या कटींग केल्या आहेत. त्याची कम्प्लेंट मी दिड वर्ष झाले करतो आहे. त्याच्यावर काय कारवाई झाली आहे. तुम्ही सुध्दा आदेश दिलेले त्यादिवशी

**दिलीप जगदाळे :-**

आयुक्त साहेबाच्या मान्यतेने बोलतो सदर व्यक्तीवरती गुन्हा दाखल केलेला आहे.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये एक पर्याय आहे ना साहेब पालिकेने जर तेथे संरक्षित भिंत टाकली तर आर.जी. आहे. आर.जी. आपल्याला ताब्यात घ्यायची आहेत. राज्यशासनाची जीआर आलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये थोडी दुरूस्ती करा. कुठले कौन्सीलर ठेवले आहेत. ठेवा म्हणत असतील त्याच सामान परत द्या म्हणत असतील. त्यांचपण सभासदत्व रद्द करायच. त्या ठरावात उल्लेख करा साहेब माझी विनंती आहे तुम्हाला की

जे कौन्सीलर सामान परत द्या किंवा ते उचलू नका अस असेल तर त्यांच सभासदत्व रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल.

**अनिल सावंत :-**

तो तुम्हाला अधिकारी आहे.

**मा. आयुक्त :-**

कारवाई करण्याचा अधिकार मला आहे पण ठरावात लिहायची आवश्यकता आहे पण.

**अनिल सावंत :-**

नगरसेवकावर कारवाई करण्याचा अधिकार तुम्हाला आहे.

**मा. आयुक्त :-**

ते अधिकार आहेत पण तुम्ही माझा अधिकार कर्मचाऱ्यावर असताना देखील ५६ प्रमाणे कारवाई करा म्हणताय. तर याला माझे अनुमोदन आहे. तुम्ही ज्या कौन्सीलरली इथे हातगाड्या राहू दे, फेरिवाले उचलू नका उचललेले सामान परत करा. ह्यांना हात लावू नका अस जे कौन्सीलर म्हणतील त्याच्यावर कारवाई करा असा तुम्ही ठरावात उल्लेख करा.

**अनिल सावंत :-**

ते अधिकार आहेत ना तुम्हाला.

**मा. आयुक्त :-**

माझा अधिकार कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याचा आहे हे तुम्ही ५६ खाली कारवाई करा म्हणताय तो ही माझाच अधिकार आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्हाला अधिकार दिलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब माझी सर्व सभागृहाला विनंती आहे की जस कर्मचाऱ्यावर ॲक्शन घ्या म्हणताय मी १०० टक्के कर्मचाऱ्यावर ॲक्शन घेणार ही वस्तुस्थिती आहे. परंतु ज्या कौन्सीलरने फोन करून सांगितल की हे हातगाडी परत करा. तिथले फेरीवाले उचलू नका, त्यांच सामान परत करा, गोरगरिबांना का त्रास देता, गरिबांची कळकळ नाही का तुम्हाला, त्यांच्या मालाची नासाडी झाली, त्यांचा माल कुजेल त्यांच परत करा, त्यांची हातगाडी तोडू नका असे जे कोणी कौन्सीलर म्हणतील त्यांच सभासदत्व रद्द करण्याची कारवाई करावी असी मी सभागृहाला विनंती करतो.

**मा. सभापती :-**

आयुक्त साहेब आता जो ठराव मांडला जुबेरजीनी त्याला आपण उत्तर दिल. लोकप्रतिनीधी साहेब प्रशासन आणि लोकप्रतिनिधी ह्याच्यामध्ये काहीतरी तफावत आहे हे तुम्हाला माहित आहे. आमच्याकडे कोण आल काय आमचा प्रश्न वेगळा असतो. एखादी शिफारस नगरसेवकाकडून आलीपण तरी देखील

**मा. आयुक्त :-**

स्टॅंडीगने सर्वानुमते निर्णय घेतला आहे.

**मा. सभापती :-**

त्यावेळेला साहेब तुम्ही याबाबतीत तुम्ही सांगता अशी अशी नोटीस द्या. आम्ही जी काम लोकप्रतिनिधी सांगतो तेव्हा ते सांगता नाही झाल तर त्यांच्यावर कारवाई करू, साहेब लोकप्रतिनिधीच तुम्ही सगळच ऐकता का मग हे पण ऐकू नका त्यांच लोकप्रतिनीधी तुम्हाला सांगतील की ही गाडी उचलू नका तर साहेब तुमच्याकडे ठराव आहे. त्याप्रमाणे तुम्ही वागा ना. एखाद्या नगरसेवकाच जरी तुम्हाला प्रेशर आल तरी त्या प्रेशरने तुमच काय नुकसान होणार आहे का? तुम्ही काय कारवाई करू शकणार नाही का. आम्ही सांगतो हे इनलिगल कन्स्ट्रक्शन आहे तर तुम्ही तोडा कुठे तुटल जात. नाही तुटत

**मा. आयुक्त :-**

ते कोर्टात पार्टी व्हायला लागत. आजसुध्दा सांगतो जे तुम्ही थाप मारून बोलता ना साहेब.

**मा. सभापती :-**

नाही साहेब आम्ही सांगितल इथ ट्राफीक आहे असाअसा स्टॉल लागला उचला ते तुम्ही नाय करणार. तुम्ही आमच नाही ऐकत आता पण नका ऐकू मी जर सभापतीना सांगितल ही गाडी उचलू नका हे ऐकायची गरज नाही साहेब. तो ठराव झालेला आहे. त्या ठरावाच पालन करा साहेब त्याच्यामध्ये नमुद कशाला करायलापाहिजे साहेब.

**जुबेर इनामदार :-**

सदस्यावर कारवाई करायचा ठराव आम्ही करू शकत नाही. आम्हाला तो अधिकार नाही.

**मा. सभापती :-**

तुमच सगळे ऐकू शकतात. तुम्ही प्रतिनिधीच ऐकायला पाहिजे अस काही नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५६ खाली कारवाई करण्याचा अधिकार माझा आहे. तरी तुम्ही त्यामध्ये उल्लेख केला याप्रमाणे कारवाई करावी.

**अनिल सावंत :-**

स्थायी समिती मागणी करू शकते.

**जुबेर इनामदार :-**

याला अंमलबजावणी तुम्ही करू शकत नाही.

**अनिल सावंत :-**

अधिनियम चुकीचा सांगू नका ना. स्थायी समितीचा अधिकार आहे तो.

**मा. आयुक्त :-**

कुठला.

**अनिल सावंत :-**

५६ खाली.

**मा. आयुक्त :-**

अधिकार आहे. तुमच्याकडे मी कारवाई केल्यानंतर अहवाल द्यायचा आणि मुदत वाढीला यायच. कारवाई करण्याचा अधिकार माझा आहे.

**अनिल सावंत :-**

तोच सांगितलाना मी.

**जुबेर इनामदार :-**

मागणी करायचा अधिकार आमचा आहे ना साहेब.

**मा. आयुक्त :-**

वाचा ना. आम्ही निलंबीत केल्यानंतर पुढील कारवाई करण्यासाठी मुदत वाढ लागत असेल तर तुमच्याकडे यायच एक वर्षासाठी स्थायी समिती पुढच्या वर्षासाठी महासभा अस आहे. कारवाई करण्याचा अधिकार माझा आहे.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त साहेब बरोबर आहे तुमच बोलण. सदस्याच बोलताना थोड काही चुकल असेल

**अनिल सावंत :-**

आम्ही तेच सांगतो तुम्ही शिफारस करा.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही मागणी केलेली आहे. ऑफिसर तुम्ही आहात.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला सदस्याच लिहायच नसेल तर अडथळा करणाऱ्या नागरिकांवर कारवाई करा. संरक्षण करणार नाही एक १५ दिवसामध्ये मी करून दाखवीन.

**जुबेर इनामदार :-**

मग विषय संपला.

**मा. आयुक्त :-**

कारण तो प्रश्न असा आहे. जे कौन्सीलर आम्हाला फोन करून सांगतात तुम्हाला नंबर दाखवू काय बोलले ते दाखवू त्यावेळेला आम्ही त्यांच्यावर पण कारवाई करा म्हणून सांगायला पाहिजे. तुम्ही ज्या गोष्टीसाठी ठाम आहात त्या गोष्टीसाठी कुणी आल तरी करा अस तुम्ही सांगत का नाही.

**जुबेर इनामदार :-**

कोणी आल तरी करा साहेब.

**मा. आयुक्त :-**

कर्मचाऱ्यासाठी कठोर आणि सदस्याना असेल तर तेवढ ऐकायच असी त्याची भुमिका होते. सगळ्यासाठी सगळे नियम सारखे असतात.

**जुबेर इनामदार :-**

साहेब एक हा जो नियम आहे ना देशासाठी प्रधानमंत्री, राष्ट्रपतीसाठी तोच नियम आहे साहेब. हा नगरसेवक आणि सदस्याच काय बोलता तुम्ही मी तर म्हणतो प्रधानमंत्री, राष्ट्रपती आला तरी ऐकू नका. नियमाप्रमाणे जी कारवाई करायची ती करा न.

**प्रविण पाटील :-**

साहेब कारवाई करा तुम्ही कोणाचा फोन आला काय आला तरी ऐकू नका साहेब. नगरसेवकावर कारवाई करा.

**अनिल सावंत :-**

यापूर्वी केल नाही आणि आता करणार नाही.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**मा. सभापती :-**

साहेब मी एक उदाहरण देतो ज्या वेळेला मी आपले पानपट्टे साहेब गाई हमेशा मोकाट सुटलेल्या असायच्या मी त्यांना वारंवार सांगायचो दहा लोकांचे मला फोन आले होते. त्या कायदयावरती मी सांगितल आहे

की गाई पकडा त्याच्यासाठी मी पुन्हा ह्या गाई सोडा म्हणून केव्हाही फोन करणार नाही. साहेब कुठल्याही गोष्टीत माझ्याबद्दल सांगाव. ह्याबाबतीत मी वोटिंगची पर्वा नाय केली. मला मोठ्या नेत्याचा फोन आलेला. गाई तिथे तुम्ही परत सोडायला सांगा म्हणून म्हटल मुळीच फोन करणार नाही. साहेब एक गोष्ट आहे. जर आम्हीच ठराव करतो त्यावेळेला आम्ही पण लोकांना सांगतो जर त्या गाई आम्ही पकडायला सांगितल्या आहेत. लोकांच्या आग्रहास्तव तर परत अम्ही सोडूच शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

सभापती साहेब ह्या सभागृहात आम्हाला बोलायला लावू नका. कृपा करा कारण तुम्ही ज्या वेळेला उचला म्हणून सांगता होते त्यावेळेला तीन सभासद सांगत होते. हात लावू नका.

**प्रविण पाटील :-**

कोण सभासद होते सांगा साहेब.

**मा. आयुक्त :-**

आता कशाला

**मा. सभापती :-**

ठीक आहे हे साहेब सर्व आपली चर्चा झाली तुम्ही कायद्याची बाजू सांगितली परंतु शेवटी हा प्रश्न शहरासाठी आहे. तुम्ही साहेब तुमच्या हातामध्ये आहे. तुम्ही तुमचे अधिकार वापरून नो फेरिवाला झोनमध्ये जे फेरिवाले बसले आहेत ते जो आपण ठराव केलेला आहे. त्याची अंमलबजावणी आपल्याकडून व्हावी.

**मा. आयुक्त :-**

माझा निर्णय झाला. मी निलंबीत केल त्याची चौकशी केल्यानंतर त्यावर मी अस निदान निर्णयापर्यंत आल की याला नोकरीत ठेवण जरूरीच नाही. त्यावेळेला स्थायी समिती पुढे काढून टाकण्यासाठी यायच आहे. बडतर्फ म्हणजे काढून टाकणे. बडतर्फ म्हणजे निलंबीत अस तुम्ही धरला.

**अनिल सावंतः-**

पाटील साहेब तुमच इन्फॉरमेंशन आल तुम्ही पाच मिनिटात देणार होतात. आता ५० मिनीट झाली. कमाल आहे. साहेब मिरारोडला आरएनए कोटीयार्ड म्हणून एक वसाहत आहे. ग्राऊंन्ड फ्लोरला पूर्ण त्यांनी शॉपींग केल आहे. शटर टाकली आहेत तिथे एक हॉसपीटल झाल आहे नविन. त्याला पाण्याची लाईन देण्यासंबंधीची म्हात्रे साहेबांनी कम्पलेन्ट केली होती की ते कमर्शियल म्हणून त्याला तुम्ही चार्ज करताय की काय तर मी टॅक्स संबंधी विचारल की कमर्शियल करता की रेसिडेन्शीयल करताय.

**विजय पाटील :-**

तुम्हाला माहिती सांगतो. त्याला पहिल्यांदा रेसिडेन्शीयल चार्ज लागला होता.

**अनिल सावंत :-**

कधी?

**विजय पाटील :-**

प्रथम त्याला चार वर्षापूर्वी कराची आकारणी झाली. तेव्हा त्याला कराची आकारणी रेसिडेन्शीयल प्रमाणे झाली आहे. आता त्यान अल्टरनेशन करून त्यांनी त्याला शटर लावली आहे.

**अनिल सावंत :-**

त्यांनी महापालिकेची परवानगी घेतली का त्यांनी

**विजय पाटील :-**

ते काय साहेब सांगता येणार नाही. महापालिकेची परवानगी घेतली की नाही.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब त्या संकुलामध्ये मोठ संकुल आहे ते पाटील साहेबाच अस म्हणन आहे की चार वर्षापूर्वी त्याला रेसिडेन्सच टॅक्स लागला. त्याने आता सगळी शटर लागली आहेत. त्याचा महापालिकेची परवानगी घेतली नाही आणि ते रेसिडन्सचा टॅक्स लावतात. हॉस्पीटलला परवानगी दिलेली आहे.

**विजय पाटील :-**

जेव्हा त्यानी कराची आकारणी करून घेतली पहिल्यांदा तेव्हा तिथे आतमध्ये वन रूम किचनचे फ्लॅट होते. आणि त्याप्रमाणे आपण त्यांना कराची अकारणी केली. आता त्यांनी काय केल आहे समोरून त्याला शटर लावलेली आहेत. सध्या गेल्यावर्षी त्यांना अजून कमर्शियल टॅक्सेशन केलल नाही.

**अनिल सावंत :-**

आणि तेथे सर्व कमर्शियल चालू आहेत.

**मा. आयुक्त :-**

तपासून घ्या अणि कर्मशियल अलाऊड नसेल तर शटर काढून टाका.

**अनिल सावंत ;-**

तिथे साहेब शॉपिंग सुरू झाल.

**मा. आयुक्त :-**

अजून चालू नाही म्हणतोय.

**अनिल सावंत :-**

तिथे हॉस्पीटल सुरू झाले इंदिरा हॉस्पीटल

**जुबेर इनामदार :-**

मिरारोड स्टेशनकडे जेवढ्या इमारती आहेत ना.

**अनिल सावंत :-**

पिछे मकान आगे दुकान अस आहे ते.

**मा. आयुक्त :-**

तपासून घ्या आणि प्रभाग अधिका-याना कळवा ते सर्वांत महत्वाच म्हणजे हॉस्पीटल हे आपण कमर्शियल धरून विचारात घेतो. पण रेसिडेन्शियल झोनमध्ये हॉस्पीटल अलाऊड आहे.

**अनिल सावंत :-**

असू दे ना.

**मा. आयुक्त :-**

प्लॅनमध्ये असणे आवश्यक आहे. जर प्लॅनमध्ये नसेल आणि रेसिडेन्शियल फ्लॅट घेतले असतील आणि कर्नव्हटेड करणार असतील. पिठाची चक्की नंतर मोटार सायकल रिपेअर्स या अत्यावश्यक सेवा आहेत त्या सगळ्या रेसिडेन्शीयल मध्ये अलाऊड आहेत. हॉस्पीटल किंवा ओपीडी जरी कर्मशियल असल तरी रेसिडेन्शीयलमध्ये अलाऊड आहे. असण आवश्यक आहे. त्याप्रमाणे प्लान केलं नसेल तर तस तपासून घ्या नाहीतर बंद करा.

**अनिल सावंत :-**

कर्नव्हट करणे गरजेचे आहे ना.

**जुबेर इनामदार :-**

स्टेशन जवळच्या जेवढ्या रेसिडेन्शीयल बिल्डींग आहेत ना साहेब तेवढ्या ऑलमोस्ट कमर्शियल झाल्या आहेत. म्हणजे समोरून त्यांनी ऑफीसस, शो-रूम त्यांच उत्पन्न वाढते ना कर्मशियल टॅक्स लावून, अधिकृत अनाधिकृत हा विचार नंतरचा आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७२ :-**

के अन्वेय प्रस्ताव — ना फेरीवला क्षेत्रामधील फेरीवाल्यांवर कारवाई करणे व नियंत्रण ठेवणे.

**ठराव क्र. ६४ :-**

के अन्वये प्रस्ताव — मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ०४ प्रभाग समिती अस्तित्वात आहेत. प्रत्येक प्रभागामध्ये मा. महासभा दि. १९/०७/२००८, ठराव क्र. ३८ बहुसंखेने पारित करण्यात आलेल्या ठरावाप्रमाणे फेरीवाला क्षेत्र व ना फेरीवाला क्षेत्र हे निश्चित केले. बाजार लिलाव अटीशर्तीना अधिन राहून फेरीवाला क्षेत्रामधुनच फेरीवाल्यांकडून ठेकेदरांनी बाजार फी वसुल करावी असा नियम आहे व त्या अनुषंगाने सदर ठेका देण्यात आला. ना फेरीवला क्षेत्रामध्ये अनधिकृत व्यवसाय करणारे फेरीवाल्यांमुळे रस्त्यावर गाड्यांची कोडी व रहदारीला अडथळा निर्माण होतो. ना फेरीवाला क्षेत्रामधील फेरीवाल्यांवर कारवाई करणे, नियंत्रण ठेवणे व बाजार फी वसुली करणा-या ठेकेदारांना अशा अनधिकृत फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुली करणेबाबत रोकणे हे प्रभाग अधिकारी व नेमलेल्या अतिक्रमण पथकांचे कर्तव्य आहे. तरी सदर बाबी तक्रार संबंधीत अधिका-याकडे करुनही समाधानकारक कारवाई केल्याची दिसून येत नाही. काही प्रभागामध्ये अनधिकृतपणे आठवडा बाजार, सोमवार व शनिवार बाजार भरविला जात आहे अशा बाजारांना फेरीवाला क्षेत्रामध्येही भरावयाची परवानगी महापालिकेने दिलेली नाही. याचा स्पष्ट उल्लेख अटीशर्तीमध्ये केलेला आहे. तरीही ठेकेदार अशा फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुल करतात. या कृतीची माहिती अधिका-यांना असूनही त्यांच्यावर जाणूनबजून कुठलीही कारवाई केली जात नाही.

सदर विषयाबाबत स्थानिक नगरसेवकांच्या तक्रारीला व बाजार अटीशर्तीना अधिन राहून जे प्रभाग अधिकारी व फेरीवाला अतिक्रमण पथकाचे कर्मचारी योग्य नियमाप्रमाणे कारवाई करत नसतील व कर्तव्यामध्ये निष्काळजीपणा दाखवित असतील अशा असक्षम अधिका-यांवर, कर्मचा-यांवर आयुक्तांची खात्री झाल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये कारवाई करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**तसेच पुढच्या मा. स्थायी समिती सभेमध्ये केलेल्या कारवाईचा आढावा सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार**　　　**अनुमोदक :- सौ. अनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मदन उदितनारायण सिंह :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २००७ मध्ये पार पडलेली असुन एकूण ७९ सदस्य निवडून आलेले आहेत. निवडून आलेले बरचे सदस्य नवीन असल्याने त्यांना सभाशास्त्र, ७४ वी घटना दुरुस्ती, पक्षांतर बंदी कायदा, सदस्य अनर्हता याबाबतची माहिती होणेसाठी महानगरपालिकेमार्फत प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे आवश्यक होते. परंतु सार्व. निवडणूक पार पडून तीन वर्ष उलटून गेलेली असून देखील महानगरपालिकेने आजपावेतो सन्मा. सदस्यांकरीता सभाशास्त्र, ७४ वी घटना दुरुस्ती, पक्षांतर बंदी कायदा, सदस्य अनर्हता या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केलेला नाही. महानगरपालिका अंदाजपत्रकामध्ये दरवर्षी सन्मा. सदस्यांच्या प्रशिक्षणाकरीता पुरेशी तरतुद करण्यात येत आहे. सन्मा. सदस्यांना सभाशास्त्र, ७४ वी घटना दुरुस्ती, पक्षांतर बंदी कायदा, सदस्य अनर्हता या विषयी पुरेसे ज्ञान प्राप्त होणेसाठी सिमला येथे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणेस व येणाऱ्या खर्चास ही स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव करण्यात येत आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब अंदमान-निकोबारला कोण कोण गेले होते आणि काय-काय शिकून आले त्याचा अहवाल स्थायीपुढे आला नाही. तुमची टिपणी यायला पाहिजे इथे आतापर्यंत केले नाही तुम्ही. अंदमानला कोण-कोण जाऊन आले.

**अनिल सावंत :-**

ते रिटार्यड झाले साहेब.

**मा. आयुक्त :-**

पण तुम्ही सगळे गेले होता ना. महासभेकडे शिफारस आहे.

**अनिल सावंत :-**

मंजूरी देऊन टाका साहेब.

**मा. आयुक्त :-**

मंजुरी कशी देता येईल, महासभेचा ठराव इथे कसा होईल. महासभेकडे शिफारस होईल. अस काय म्हणता महासभा ही महासभा

**अनिल सावंत:-**

महासभेने बजेटच्या वेळेला मंजूरी

**मा. आयुक्त :-**

८४ सदस्यापैकी १६ सदस्य इथे असतात.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

नविन जी.आर. निघालेला आहे. त्याच्यामध्ये आपण मोकळे भूखंड आहेत. ते सप्टेंबर पूर्वी घेणार होतो. आता काय झाल नगरसेवक निधीमधून आम्ही प्रभाग क्रं. ५९ मध्ये त्याठिकाणी एक बिल्डरच टाईल्स फॅक्टरी आहे. ती अनधिकृत फॅक्टरी आहे. त्या मैदानामध्ये आमचा विचार होता की नगरसेवक निधी मधून ते जर जीआर च्या प्रमाणे झाल तर त्याठिकाणी एक समाज मंदिर बांधायच होत आणि एक व्यायामशाळा

**मा. आयुक्त :-**

ती कोणाची आर.जी. आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

शांतीस्टार बिल्डर.

**मा. आयुक्त :-**

शांतीस्टारने शेड-बिड काढल ना सगळ.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

नाही काही नाही काढल.

**मा. आयुक्त :-**

काढल म्हणून पत्र दिल आहे त्यांनी.

**भरत जगताप :-**

सेक्टर एक मधले काढले आहे. अकरा सेक्टर आहेत.

**मा. आयुक्त :-**

एक मधल ऑफीस होत त्याच.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आमच्या इथे पाच मध्ये टाईल्स फॅक्टरी किती जुनी आहे ती.

**अनिल सावंत :-**

साहेब तो वापरतोय

**चंद्रकांत म्हात्रे :-**

शांतीस्टार बिल्डर भाड्याने देतात.

**अनिल सावंत :-**

आणि आपल्याला काय टॅक्स वैगेरे काय नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

भाड्याने देतात.

**अनिल सावंत :-**

वीस वर्षाचा टॅक्स घ्या त्याच्या जवळून

**चंद्रकांत म्हात्रे :-**

नगरसेवक निधीमधून दिलेला आहे तर ते काय म्हणाले इथून सांगितलेल आहे की नगररचना निधीमधून आणा. आणि आम्हाला आर्डर आली तर आम्ही बांधकाम पूर्ण करू.

**मा. आयुक्त :-**

तुमच काय मत आहे साहेब

**अनिल सावंत :-**

तर त्याच्याकडून २० वर्षाचा प्रॉपर्टी टॅक्स वसुल करा.

**मा. आयुक्त :-**

आर.जी. मध्ये १०-१५ टक्के बांधकाम अलाऊंड करू आपण. परंतु त्यांना जी नोटीस दिलेली आहे. त्याची मुदत संपू द्या. १५ दिवसानंतर आपण जे ओपन फेसेच आर.जी. आहे. ते ताब्यात घ्यायला सुरूवात करणार आहोत. बांधकाम विभागाकडून कन्स्ट्रक्शन करून. कारण ही जी रक्कम आहे. ती त्यांच्याकडूनच वसुल करणार आहे तशी नोटीस दिलेली आहे. जरी तुमचा नगरसेवक निधी वापरून जरी खर्च केला. तरी मालकाकडूनच वसुल करणार आम्ही बांधकाम तुमच्या नगरसेवक निधीच म्हणून करू. परंतु रक्कम वसुली त्यांच्याकडून करणार आहेत. म्हणजे आम्हाला परवा जी चर्चा झाली. ते एक नंबर सेक्टरच मोकळ केल आम्ही हे सेक्टर कस राहिल ते मला माहित नाही. सगळे काढून टाक. परंतु ती आर.जी. आहे का ती काढून टाक. परंतु का ते आणि तुमचा वापर करू देत १५ दिवसा नंतर.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

सेक्टर पाच मध्ये कॉर्नरवर एक जागा आहे ती जागा आहे. ती जागा एकान कॅपचर करण्याच्या मार्गावर आहे. तिथे मंदिर बांधण्याच्या हेतुने त्याच्यासाठी एक पत्र दिल आहे. तिथे नगरपालिकेने कंपाऊंड वॉल बांधून घ्यावा म्हणजे तेथे कोण मंदिर बांधणार नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

सेक्टर १ ते ११ मध्ये पूर्ण इन्फेक्शन करुन काय करायचे ते आम्ही ठरवणार आहोत.

**अनिल सावंत :-**

त्यामध्ये इस्पेक्शन करते वेळी त्याने मोकळ्या जागेवर प्रत्येक सेक्टरमध्ये दोन-तीन आपल्या माणसान दुकान काढून दिलेली आहेत. त्याचा सुध्दा काय टॅक्स वैगरे लावला नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

तिथे साहेब भरणी टाकायच काम चालू आहे म्हणून सांगितल.

**प्रकरण क्र. ७३ :-**

के अन्वये प्रस्ताव - महानगरपालिकेच्या सन्मा. सदस्यांकरीता प्रशिक्षण दौरा आयोजित करणेबाबत.

**ठराव क्र. ६५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २००७ मध्ये पार पडलेली असुन एकूण ७९ सदस्य निवडून आलेले आहेत. निवडून आलेले बरचे सदस्य नवीन असल्याने त्यांना सभाशास्त्र, ७४ वी घटना दुरुस्ती, पक्षांतर बंदी कायदा, सदस्य अनर्हता याबाबतची माहिती होणेसाठी महानगरपालिकेमार्फत प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे आवश्यक होते. परंतु सार्व. निवडणूक पार पडून तीन वर्ष उलटून गेलेली असून देखील महानगरपालिकेने आजपावेतो सन्मा. सदस्यांकरीता सभाशास्त्र, ७४ वी घटना दुरुस्ती, पक्षांतर बंदी कायदा, सदस्य अनर्हता या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केलेला नाही. महानगरपालिका अंदाजपत्रकामध्ये दरवर्षी सन्मा. सदस्यांच्या प्रशिक्षणाकरीता पुरेशी तरतुद करण्यात येत आहे. सन्मा. सदस्यांना सभाशास्त्र, ७४ वी घटना दुरुस्ती, पक्षांतर बंदी कायदा, सदस्य अनर्हता या विषयी पुरेसे ज्ञान प्राप्त होणेसाठी सिमला येथे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणेस व येणाऱ्या खर्चास ही स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांनी खेळी मेळीच्या वातावरणामध्ये आजची सभा पार पडल्याबद्दल आपल्या सर्वांचे धन्यवाद. आणि आजची सभा संपली असे जाहिर करतो. जय हिंद। जय महाराष्ट्र ।

**(सभा संपल्याची वेळ दु. १.४५ वा. )**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**